www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 296 | गुरुवार दि. 10 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून
### शासनाच्या दरबारात

### कोंडावर लेआउट जलमय!
प्रशासनाच्या उदासीनतेचा नागरिकांना तडाखा



दैनिक युवक आधार घाटंजी
(प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)

घाटंजीतील आनंद नगर परिसरातील कोंडावर लेआउटमध्ये पावसाचं पाणी थेट घरात! नाल्यांचा अभाव, खराब रस्ते आणि जलनिकासीची फसलेली व्यवस्था – नागरिक त्रस्त, नुकसानग्रस्त!

**नगरपरिषदेने कर वसूल केला, पण सुविधा दिल्या नाहीत. संतप्त नागरिकांचा सवाल – "कर दिल्यावर हक्क कुठे?"**

# महाराष्ट्रातील 'या' जिल्ह्यात 10 जुलैला शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

पालक आणि विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. विदर्भात पावसाने थैमान घातलं आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरीमध्ये पावसाने जीनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यात भारतीय हवामान खात्याने चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. मागील दोन दिवसांपासून ब्रह्मपुरी तालुक्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. परिणामी, नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात शाळा, कॉलेजला सुट्टी!

हवामान खात्याने मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी आणि संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा विचार महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये तसंच खाजगी कोचिंग क्लासेस यांना गुरुवारी 10 जुलैला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. हा आदेश फक्त ब्रह्मपुरी




तालुक्यातसाठी लागू राहणार आहे. जिल्ह्यातील अन्य तहसिलांतील शाळा आणि शिक्षणसंस्था सुरु राहतील. या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज पार पाडावे, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. गोसेखुर्द प्रकल्पातून 18000 क्यूमेक्स पर्यंत पाण्याचा विसर्ग करण्यात येतोय. त्यामुळे जिल्ह्यातील ब्रम्हपुरी विभागात पूर परिस्थितीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने सुट्टीचा निर्णय घेतला आहे.

गोसीखुर्द प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून प्राप्त माहितीनुसार धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे वैनगंगा नदीपात्रामध्ये पूरनियंत्रणासाठी 16,500 ते 18,000 क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येणार आहे.

'या' जिल्ह्यातीलही शाळा आणि कॉलेजला सुट्टी!

भंडारा जिल्ह्यात 3 दिवसापासून पावसाची सततधार सुरू आहे. जिल्ह्यात अनेक भागात अचानक पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुषंगाने भारतीय हवामान खाते यांनी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. तसेच अनेक तालुक्यातील रस्ते मार्ग हे पुराच्या पाण्याने प्रभावित झाले असून जिल्ह्यातील 81 रस्ते हे पुरामुळे वाहतुकीस बंद करण्यात आलेले आहे. भंडारा जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये या करिता जिल्हयातील सर्व अंगणवाडी,

शाळा आणि महाविद्यालये मधिल विद्यार्थाना गुरुवारी 10 जुलैला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे पूरस्थिती, एकूण 22 मार्ग बंद झाले आहेत. आपत्ती व्यवस्थापन दले सज्ज असून जिल्ह्यात 24 तासात 42 मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली आहे. तर उत्तर गडचिरोलीत सर्वाधिक पाऊस झाला आहे.

# पाग शिवसेनेचा गुणगौरव सोहळा विद्यार्थांसाठी प्रेरणादायी..आम.भास्कर जाधव

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

आपल्या यशाचं कौतुक बाहेर कितीही झालं तरी आपल्या कुटुंबाने आपल्या पाठीवर मायेने दिलेली थाप ही आपल्या वाटचालीत मोलाची शिदोरी असते.त्यामुळे आजचा हा गुणगौरव सोहळा सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि भावी आयुष्यासाठी बळ देणारा ठरेल अशी भावना शिवसेना नेते तथा आमदार भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. शहरातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पाग विभागाच्या वतीने उपशहरप्रमुख विकी नरळकर यांच्या पुढाकाराने आयोजित गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते.येथील श्रीकृष्ण सभागृहात हा गुणगौरव सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर चिपळूणचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. राजमाने,सावर्डे पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक श्री.आबासाहेब पाटील, तालुकाप्रमुख बळीराम गुजर, अर्बन बँक संचालक मोहन मिरगल, माजी नगरसेवक फैसल कासकर आदी मान्यवर उपस्थित



होते. यावेळी बोलताना आमदार जाधव यांनी उपस्थित गुणवंतांना आजच्या युगातील स्पर्धेचे महत्व सांगताना केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.आजचा गुणगौरव सोहळा हा दृष्ट लागावी असा होतोय असे सांगताना ज्यांनी ज्यांनी आपल्या यशाचं कौतुक केलं आहे त्यांची आठवण ठेवून मार्गक्रमण करावं अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक माजी नगरसेवक विकी नरळकर यांचे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे भास्कर जाधव यांनी कौतुक केले. कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्याना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेछा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सचिन खरे यांनी केले,तर माजी नगरसेवक उपशहर प्रमुख विकी नरळकर यांनी उपास्थित मान्यवरांचे स्वागत करून विध्यार्थी, पालक,पाग ग्रामस्थ यांचे आभार मानले. या सोहळ्याला मंगेश शेलार,संजय भुवड, रुपेश तांबडे, विभागप्रमुख, महेंद्र कांबळी, ऐश्वर्या घोसाळकर, श्रद्धा घाडगे ,सुचित्रा खरे , आदेश किंजळकर, अभि शिंदे माजी नगरसेवक किसन शेठ भुवड, नंदकुमार सावंत, रवि घाडगे, सुधीर लिंगायत, रवींद्र ठसाळे, राजन चिले, शिवप्रकाशजी घाटगे , अनंत शिंदे, विजय बामणे , संतोष खेडेकर, बालम खेडेकर, सुनिल बांदेकर, संजय सावंत, अविनाश सावंत, महम्मद अली झारे, मोहम्मद कास्कर, सुनिल चिले ,शैलेश गोगडे यांच्यासह पाग ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल न्यायालयात मध्यस्थी केंद्राचे उद्घाटन, वाद मिटवण्यासाठी ९० दिवसांची विशेष मोहीम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व मध्यस्थी समुपदेशन प्रकल्प समिती यांच्या संकल्पनेतून "MEDIATION FOR THE NATION" या अभियानाअंतर्गत ९० दिवसांची विशेष मध्यस्थी मोहीम १ जुलै २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत न्यायालयीन प्रलंबित वाद मध्यस्थीद्वारे लवकरात लवकर




निकाली काढण्यावर भर दिला जात आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने ७ जुलै रोजी पनवेल न्यायालयात मध्यस्थी केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राचे उद्घाटन सचिव विधी सेवा प्राधिकरण न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांच्या हस्ते, तसेच तालुका विधी सेवा प्राधिकरण, पनवेलचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ न्यायाधीश शैलेश उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाला पनवेल न्यायालयातील सर्वच न्यायाधीश, तसेच वकील संघटनेचे पदाधिकारी आणि विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना आपले वाद न्यायालयात दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्याऐवजी सामंजस्याने मिटविण्याचा मार्ग उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित प्रकरणांची मध्यस्थीद्वारे सोडवणूक करून मैत्री, नाते आणि संबंध टिकवा! या संकल्पनेतून पुढे यावे, तसेच अधिक माहितीसाठी पनवेल न्यायालयातील मध्यस्थी केंद्रात भेट द्या असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल आरटीओ कार्यालयामध्ये 'ADC' नावाखाली लाचखोरी; राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

: पनवेल आरटीओ कार्यालयामध्ये 'ADC' नावाखाली चालणाऱ्या दलालगिरी, लाचखोरी व अनधिकृत व्यक्तींबाबत १५ दिवसांत ठोस कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहबाज फारूक पटेल यांनी दिला आहे. पनवेल आरटीओ कार्यालयामध्ये गेल्या काही महिन्यांपासूर 'ADC' नावाखाली काही अनधिकृत व्यक्ती खुलेआम वावरत आहेत. या दलालांच्या मदतीने ड्रायविंग लायसन्स, वाहन कागदपत्र ट्रान्सफर, तपासणी व इतर सेवा या नागरिकांकडून बेकायदेशीररित्या लाच घेऊन पूर्ण केल्या जात आहेत. हा प्रकार केवळ गैरकायदेशीरच नाही, तर सामान्य नागरिकांच्या हक्कांची शर्तस पायमल्ली करणारा आहे. त्यामुळे ADC च्या नावाखाली वावरणाऱ्या सर्व अनधिकृत व्यक्तींना त्वरित आरटीओ कार्यालयातून हद्दपार करावे, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करावी, तसेच मागील ३ महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करून दोषींचा पर्दाफाश करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहबाज फारूक पटेल यांनी पनवेल आरटीओ कार्यालयाला केली आहे. तसेच या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेस पनवेलच्या वतीने आरटीओ कार्यालयासमोर धरणे आंदोलन



करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

# खांदा कॉलनी सेक्टर 4 व 5 ला जोडणाऱ्या पुलांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

खांदा कॉलनीत गेली बरीच वर्षे सेक्टर 4 व 5 ला जोडणाऱ्या पुलांची मागणी नागरिकांनकडून होत होती ती अखेर पुर्ण होणार आहे नुकतेच या पुलांचे टेंडर प्रोसेस पुर्ण होऊन पूलांचे काम सुरू झाले आहे खांदा कॉलनीतल भाजपचे माजी नगरसेवक यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून ही मागणी पनवेल महापालिके कडे केली होती या पुलामुळे खांदा कॉलनीत जाणारे अंतर कमी होईल व नागरिक लवकर खांदा कॉलनीत जातील व प्रवास नागरिकांना सुलभ होईल या भूमिपूजन कार्यक्रमाला माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड माजी उपमहापौर सिताताई पाटील माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील माजी सरपंच शशिकांत शेळके मंडल सरचिटणीस भिमराव पोवार जेष्ठ नेते शांताराम महाडिक संजय कांबळे सदानंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते



# नशामुक्ती जनजागृती विशेष कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय ड्रग्ज गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिन या आंतरराष्ट्रीय दिवसाचे औचित्य साधून, तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या वतीने आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) च्या मार्गदर्शनाखाली बीसीटी लॉ कॉलेज, खांदा कॉलनी येथे नशामुक्ती जनजागृती विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. समाजात वाढत्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः युवकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. या कार्यक्रमास पनवेल येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायाधीश जागोष्टे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा मागोवा घेत, नशा मुक्त जीवनशैलीचे सामाजिक




आणि कायदेशीर पैलू स्पष्ट करत उपस्थित श्रोत्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. त्यांच्या अनुभवसंपन्न भाषणाने उपस्थितांमध्ये विचारप्रवृत्ती निर्माण झाली. या मंचावर पॅनल अड. इंद्रजीत भोसले यांनी विषयाच्या पार्श्वभूमीवर सखोल मार्गदर्शन करत कायद्याच्या चौकटीतून व्यसनमुक्तीचा दृष्टिकोन समजावून सांगितला. अड. दिपाली वोरा यांनी 'जागृती समिती'च्या भूमिकेवर आणि समाजात अशा उपक्रमांची गरज का आहे, यावर माहितीपूर्ण आणि सुस्पष्ट भाष्य केले. या कार्यक्रमाचे प्रभावी प्रास्ताविक विधी स्वयंसेवक शैलेश कोंडस्कर यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश, उपस्थित मान्यवरांची ओळख आणि संपूर्ण उपक्रमाचा संदर्भ सुसंगतपणे मांडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांचा देखील सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करत नशामुक्त समाजासाठी शैक्षणिक संस्थांची जबाबदारी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव देणारे अशा प्रकारचे उपक्रम किती गरजेचे आहेत, यावर त्यांनी भाष्य केले. विद्यार्थ्यांची उदंड उपस्थिती, मान्यवरांचे सखोल मार्गदर्शन आणि समृद्ध संवाद यामुळे हा कार्यक्रम केवळ माहितीपर न राहता एक वैचारिक जागृती ठरला. समाजात 'नशा विरहित भारत' घडवण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल निश्चितच एक सकारात्मक आणि सशक्त संकल्प ठरेल.

# रायगड जिल्हा परिषद शाळा शिवणसई आंबे मोफत छत्री वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी:**

– पावसाळ्याचे दिवस चालू असून अनेक विद्यार्थ्यांना येण्या जाण्यास साठी पावसापासून संरक्षण होण्यासाठी आज बुधवार दिनांक ९ जुलै रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा शिवणसई आंबे येथे रिटघर गावचे ॲड सौ रेश्मा ताई गुरुनाथ भोपी व श्री गुरुनाथ भिवा भोपी यांच्या कडून शिवणसई शाळेत विद्यार्थ्यांना मोफत छत्री वाटप करण्यातआले



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे ग्रुप ग्रामपंचायत दुदंरे चे थेट सरपंच सुभाषशेठ भोपी उपस्थित होते तसेच यावेळी उपस्थित मान्यवर ॲड गुरुनाथ भोपी माजी सरपंच भारत भोपी दुदंरे ग्रामपंचायतील सदस्य विश्वास पाटील,ग्रामसेवक अजिनाथ खेडेकर, संतोष पाटील, विजय पाटील,जगदिश पाटील सुभाष पालकर आदी मंडळी सह शाळेचे मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद महिला मंडळ शिवणसई आंबे आदी उपस्थित होते

## नवनियुक्त तहसीलदार सतीश सोनी यांचा विकास परिषदेच्या वतीने सत्कार



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** गंगापूर तहसील कार्यालयातून नुकतेच सिल्लोड येथील तहसील कार्यालयात बदली झालेले नवनियुक्त तहसीलदार सतीश सोनी यांचा रुजू झाल्याबद्दल क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा शिवसैनिक संदिप मानकर, शिवसेना महिला आघाडीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्षा दुर्गाताई पवार, सामाजिक कार्यकर्ते संतोष जोगदंड, गजानन मानकर, रतन अंभोरे आदींची उपस्थिती होती..!!

## चाणजे ग्रामस्थ व मच्छीमार बांधवांचा आक्रोश,

### करंजा-रेवस पुलामुळे नुकसान, पण भरपाई कुठे?

**दैनिक युवक आधार**
**उरण/प्रतिनिधी**

**उरण-**अलिबाग दरम्यान सुरू असलेल्या करंजा-रेवस पुलाच्या कामामुळे चाणजे गावातील शेतकरी व मच्छीमार बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. जमिनी गेलेल्या आहेत, मासेमारीच्या जागा उद्ध्वस्त झाल्या आहेत, आणि पारंपरिक रोजगार हिरावला गेला आहे. मात्र सरकार आणि प्रशासन अजूनही ढिम्म झोपेत आहे. या प्रश्नावर गेल्या अनेक महिन्यांपासून सतत पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस भरपाई किंवा मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. आज चाणजे गावच्या शिष्टमंडळाने अलिबाग-मुरुड मतदारसंघाचे आमदार श्री. महेंद्र दळवी यांची भेट घेऊन याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. यावेळी सरपंच अजय म्हात्रे, माजी सभापती सागर कडू, माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम नाखवा, सामाजिक कार्यकर्ते सचिन रमेश डाऊर, कुंदन नाखवा आदी उपस्थित होते. या बैठकीत शेतकरी व मच्छीमारांना झालेल्या नुकसानीसाठी त्वरित नुकसानभरपाई जाहीर करावी, तसेच पुनर्वसनाचा आराखडा सादर करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. जर लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात आला नाही, तर चाणजे ग्रामस्थांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे. "विकास हवा, पण आमच्या हक्कांवर गदा नको! शेतकरी व मच्छीमारांना न्याय मिळालाच पाहिजे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## बीड जिल्ह्यात परळी येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक युवक आधार
मुंबई.प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी येथे सध्या अस्तित्वात असलेल्या औष्णिक वीज केंद्रात आणखी वीज निर्मिती संच वाढविण्याची बाब तपासली असता ती व्यवहार्य नसल्याचे निदर्शनास आले आहे. नवीन संच निर्मिती शक्य नसले तरी संच क्रमांक एक ते पाचच्या जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

परळी औष्णिक वीज केंद्राच्या बाबत सदस्य धनंजय मुंडे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य सरोज अहिरे यांनी उपप्रश्न उपस्थित केला.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वीजपुरवठा स्वस्त दरात असावा. यासाठी तासागणिक दराच्या आधारे स्वयंचलित यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यातील वीजपुरवठा स्वस्त दरात मिळावा, यासाठी तासागणिक दराच्या आधारे स्वयंचलित यंत्रणा ' मेरिट ऑर्डर डिस्पॅच' कार्यान्वित करण्यात आली आहे. यानुसार स्वस्त असलेली वीज ही ' लोड डिस्पॅस सेंटर' आणि पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) च्या माध्यमातून ऑटोमेटेड प्रक्रियेतून घ्यावी लागते. त्यानुसार बंधने घालण्यात आली असून औष्णिक वीज उत्पादनाचा खर्च जास्त असल्याने नवीन औष्णिक वीज संच उभारणे शक्य नाही.संच क्रमांक ६, ७ व ८ हे सुरु असल्याने परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या कार्यक्षमतेवर किंवा रोजगारावर कोणताही परिणाम झालेला नाही. परळी औष्णिक विद्युत केंद्रातील नवव्या संचाच्या उभारणी संदर्भातील एमओडी (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) उभारणीसंदर्भातील तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी लवकरच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# रेवदंडा आगरकोट किल्ला धोक्यात ! पुरातत्तव विभाग, पर्यावरण मंत्रालय आणि प्रशासन गप्पच!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

समुद्रसपाटीपासून अवघ्या ४ फूट उंच असलेल्या ऐतिहासिक किल्ल्यावर पंचतारांकित बंगल्यांचे बेकायदेशीर चार मजली बांधकाम ? पुरातत्त्व विभाग, पर्यावरण मंत्रालय आणि प्रशासन गप्पच!

रेवदंडा येथील ऐतिहासिक आगरकोट किल्ल्यावर चार मजली पंचतारांकित बंगल्यांचे बांधकाम सुरू असून, हे बांधकाम पुरातत्त्व कायदा, पर्यावरण नियम आणि सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर उल्लंघन करणारे आहे. विशेष म्हणजे हे बांधकाम किल्ल्याच्या जुन्या भिंती पाडून, समुद्रसपाटीपासून अवघ्या चार फूट उंच असलेल्या जागेवर केले जात आहे. या प्रकारामुळे केवळ इतिहास आणि निसर्गच नव्हे, तर पर्यटक आणि नागरिकांचे प्राणही धोक्यात येऊ शकतात.किल्ल्याची धोकादायक भौगोलिक स्थिती ढासळण्याचा धोका वाढतोय! आगरकोट किल्ला हा सागरकिनारी वसलेला असून समुद्रसपाटीपासून अवघ्या ३.५–४ फूट उंच आहे. दररोज समुद्राच्या लाटा थेट किल्ल्यावर आपटतात. अशा परिस्थितीत चार मजली अवजड बांधकाम केल्यास किल्ल्याचा पाया





कमकुवत होऊन तो कोणत्याही क्षणी खचू शकतो, असा इशारा पर्यावरण अभ्यासक देत आहेत. पर्यटकांच्या जिवाशी खेळ सुरक्षा नियम धाब्यावर! या परिसरात दररोज शेकडो पर्यटकांची वर्दळ असते. किल्ला ढासळल्यास भयावह जीवित व वित्तहानी होण्याचा धोका आहे. प्रशासकीय दुर्लक्षामुळे जर दुर्घटना झाली, तर त्यास जबाबदार कोण असेल, असा संतप्त सवाल आता स्थानिक विचारू लागले आहेत.

'ग्रीन हेरिटेज झोन'मध्ये आधुनिक बांधकाम? कायद्याला हरताळ!आगरकोट किल्ला केवळ ऐतिहासिक नव्हे, तर "ग्रीन हेरिटेज झोन" म्हणून नोंदलेला आहे. येथे अनेक दुर्मीळ वनस्पती, पक्षी आणि जैवविविधता आढळते. याठिकाणी कोणतेही आधुनिक बांधकाम किंवा बदल करणे हे वनविभाग व पर्यावरण मंत्रालयाच्या नियमांनुसार पूर्णतः प्रतिबंधित आहे.किल्ल्याच्या भिंती पाडून बांधकाम परवानगी कुणाची? स्थानिकांच्या म्हणण्यानुसार या कामासाठी आगरकोट किल्ल्याच्या काही ऐतिहासिक भिंती पाडण्यात आल्या आहेत. हे स्थळ महाराष्ट्र पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली असूनही येथे गुपचूप काम सुरु असल्याने प्रश्न उपस्थित होतो – या कामास कोणाची परवानगी आहे? "राज्यपाल, मुख्य सचिव, पुरातत्त्व व पर्यावरण विभाग यांची लेखी परवानगी आहे का? परवानगी असेल तर ती सार्वजनिक का नाही? नसेल तर हे काम सुरू कसं?"

प्रशासन गप्प – हेतुपुरस्सर दुर्लक्ष?रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र पुरातत्त्व विभाग आणि पर्यटन विकास मंडळ यांची यावर ठोस प्रतिक्रिया नाही. त्यामुळे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा संशय नागरिकांमध्ये व्यक्त होतो आहे.केंद्रीय यंत्रणांचं लक्ष वेधण्याची तयारी , 'मनसे'ची भूमिकाही अपेक्षित,या प्रकरणाची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्रालय, पुरातत्त्व विभाग आणि पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवण्याची तयारी स्थानिकांनी सुरू केली आहे. यापूर्वी अशा मुद्द्यांवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्पष्ट भूमिका घेतली असल्याने, त्यांच्या हस्तक्षेपाचीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.'इतिहास वाचवा – निसर्ग वाचवा'चा बुलंद नारा.रेवदंडा परिसरातील सामाजिक संघटना, अभ्यासक, पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक यांनी आक्रमक भूमिका घेत "इतिहास वाचवा निसर्ग वाचवा" अशी मोहीम सुरु केली आहे. आंदोलनाची शक्यता नाकारता येत नाही.

**"महत्त्वाचे मुद्दे :**

1. आगरकोट किल्ल्यावर चार मजली बंगल्यांचे बेकायदेशीर बांधकाम
2. समुद्रसपाटीपासून 4 फूट उंची – लाटांमुळे किल्ला ढासळण्याची शक्यता
3. पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीतील भिंती पाडल्या
4. पर्यावरण आणि ग्रीन हेरिटेज झोनमध्ये बांधकाम कायदेशीर?
5. पर्यटकांच्या जिवाला धोका – सुरक्षा यंत्रणा मौन
6. परवानगीचा खुलासा नाही – प्रशासन गप्प का?
7. केंद्रीय सरकारकडे तक्रार आणि राजकीय हस्तक्षेपाची मागणी
8. स्थानिकांचा तीव्र विरोध, आंदोलनाची शक्यता

## पाटबंधारे विभाग वाशिम यांनी घेतली जलसमाधी आंदोलन कर्त्याची तात्काळ भेट. आंदोलन कर्त्याच्या मागण्या केल्या मान्य.



**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

रिसोड तालुक्यातील कुकसा जोगेश्वरी धरणाच्या भिंतीवरील झाडे फांद्या तोडण्यासाठी शिवसंग्राम चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील बाजड यांनी दिले होते पाटबंधारे विभागाला निवेदन. आणि निवेदनाद्वारे 09.जुलै रोजी जलसमाधी आंदोलन करण्याचा शिवसंग्रामद्वारे इशारा सुद्धा दिला होता. त्याच अनुषंगाने 09.जुलै रोजी सकाळी दहा वाजता तात्काळ पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता वाशिम चव्हाण साहेब व चिखलीकर साहेब यांनी जलसमाधी आंदोलन कर्ते शिवसंग्राम चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील बाजड. तसेच शिवसेना वाशिम जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे. व जोगेश्वरी ग्रामपंचायतचे सरपंच दीपक पाटील वाळूकर व जोगेश्वरी. अंचळ. कुकसा. नेतंसा मांगुळ झनक. इत्यादी गावाच्या ग्रामस्थांच्या समोर जलसमाधी आंदोलनाची दखल घेऊन धरणाच्या भिंतीवरील 40% झाडे तोडण्यात आलेली आहेत सतत पाऊस सुरू असल्यामुळे झाडे तोडणे कठीण जात आहे तरी एक महिन्याची मुदत झाडे तोडण्यासाठी वाढवून देण्याबाबत लेखी पत्र आंदोलन करताना यावेळी कार्यकारी अभियंता चव्हाण साहेब वाशिम व चिखलीकर साहेब यांनी ग्रामस्थांना व आंदोलन कर्त्यास दिले. उपस्थित जनसमुदायांसोबत विचार विनिमय करून सदर जलसमाधी आंदोलन एक महिन्याकरिता स्थगित करण्यात आलेले आहे एक महिन्यांमध्ये दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही तर याच ठिकाणी सभा घेऊन जलसमाधी आंदोलन करण्यात येईल असे यावेळी आंदोलन करताना अधिकाऱ्यांना खडसावून सांगितले. परिसरातील जनसमुदाय यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता. धरणाच्या परिसरातील विविध समस्या यावेळी शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता समोर मांडल्या. सदर समस्याकडे सुद्धा लक्ष घालण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

## आषाढी वारी निमित्त ईट प्ले रीडचा वारीमध्ये आनंददायी सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महाराष्ट्रात मोठ्या स्तरावरती आषाढी एकादशी वारी सोहळा साजरा केला जातो. लाखो भाविक पायी १८ दिवसाचा हा प्रवास करतात, सर्व तहान भूक विसरून विठूरायाच्या दर्शनाला जातात. ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या राजदूतांनी आणि अपर्णा शहा यांनी या दिंडीमध्ये सहभागी होवून हा जनजागृतीचा आवाज खा, खेळा, वाचा हा सर्व समाजात पोहोचवला. धन्वंतरीत ऑर्गनायझेशन फॉर सोशियो हेल्थ ट्रान्सफार्मिशन दोस्त मुंबई विश्वस्त मंडळ डॉ. कैलाश जवादे, डॉ. वैशाली जवादे तसेच त्यांचे सहकारी श्रीकांत गाविद यांच्यासोबत हा उपक्रम राबवला. त्यांच्यासमवेत हा सोहळा पाहण्यात आला. त्याचबरोबरीने भाविकांना मोफत रेनकोट, बिस्किट्स, तांदूळ, डाळ वाटप खा, खेळा, वाचा अभियानाअंतर्गत वाटप करण्यात आले. यावेळी भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद उमलून आला.




## होमिओपॅथिक डॉक्टरांची वैद्यकीय परिषदेत नोंदणी म्हणजे गंभीर आरोग्य धोका : डॉ. कांचन मदार

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल) दिनांक ३० जून २०२५ रोजी जारी केलेल्या निर्णयानुसार 'समकालीन औषधशास्त्र अभ्यासक्रम' (CERTIFICATE COURSE IN MODERN PHARMACOLOGY – CCMP) पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना वैद्यकीय परिषदेत नोंदणी करण्याची मुभा देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. मात्र हा निर्णय सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणारा आहे, अशी माहिती डॉ. कांचन मदार (संयोजिका, महिला डॉक्टर विंग, महाराष्ट्र राज्य) यांनी दिली. या निर्णयाचा निषेध करताना डॉ. कांचन मदार म्हणाल्या, "होमिओपॅथिक डॉक्टरांनी केवळ एक वर्षाचा समकालीन औषधशास्त्र अभ्यासक्रम (CCMP) पूर्ण केल्याने त्यांना 'वैद्यकीय' डॉक्टर समजणे हे पूर्णपणे चुकीचे आहे.



एमबीबीएस ही पाच वर्षांची कठीण आणि शिस्तबद्ध पदवी आहे. अशा तात्पुरत्या अभ्यासक्रमातून पूर्ण वैद्यकीय शिक्षणाची समकक्षा साधता येऊ शकत नाही." "महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही केवळ एमबीबीएस व तत्सम वैद्यकीय पदवी प्राप्त केलेल्या डॉक्टरांसाठी आहे. होमिओपॅथिक डॉक्टरांना स्वतंत्र परिषद अस्तित्वात असताना त्यांना वैद्यकीय परिषदेच्या यादीत सामावून घेणे म्हणजे नियम धाब्यावर बसवण्याचा प्रकार आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. "या निर्णयामुळे दोन पूर्णपणे वेगळ्या उपचारपद्धतीच्या डॉक्टरांना एकाच व्यासपीठावर आणल्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर आणि उपचार प्रक्रियेच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होऊ शकतो," असा इशाराही डॉ. मदार यांनी दिला.

**प्रश्न विधानसभेत उपस्थित करा; डॉक्टरांचा आग्रह**

या अन्यायकारक निर्णयावर त्वरित पुनर्विचार व्हावा, अशी विनंती त्यांनी राज्य शासनाला केली आहे. तसेच, विधानसभेत यासंदर्भात प्रश्न उपस्थित करून हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. "होमिओपॅथिक डॉक्टरांनी त्यांचे कार्य त्यांच्या परिषदेअंतर्गत करावे. त्यांना वैद्यकीय परिषदेतील नोंदणी देऊ नये. अन्यथा राज्यभरातील आधुनिक वैद्यकीय डॉक्टर आंदोलन करण्यास भाग पाडले जातील," असा इशाराही डॉ. कांचन मदार यांनी दिला.

## पिलीव येथे महाराष्ट्रीयन बेंदूर सण उत्साहात साजरा"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**
**रघुनाथ देवकर**

माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे महाराष्ट्रीयन बेंदूर या सणाचे आयोजन करण्यात आले होते. गावच्या वेशीत प्रथेप्रमाणे सर्व शेतकरी बांधवांनी आपली बैल गाई वेगवेगळ्या प्रकारे व प्रथेप्रमाणे अतिशय सजावट करून आणल्या होत्या त्याप्रमाणे श्री बाबुराव सोपानराव पाटील, करण बाबुराव पाटील यांचे हस्ते तोरणाची पूजा करण्यात आली. सर्व मदने पाटील परिवार, खुर्द पाटील परिवार ,जावळे पाटील परिवार ,कपने परिवार, लेंगरे परिवार, जरग परिवार त्याचप्रमाणे असंख्य ग्रामस्थ मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन ग्रामदैवत मारुती मंदिरापासून श्री मसोबा मंदिरापर्यंत सर्व शेतकऱ्यांनी आपापली सजवलेली बैल, गाई मिरवणुकीतून वाजत गाजत आणली होती. मिरवणुकीला अतिशय चांगल्या पद्धतीने प्रतिसाद मिळाला. शांततेत मिरवणूक पार पडणेकामी पोलीस स्टेशन पिलीव यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.



## येरोळ व परिसरातील शेतकरी कोळपणी कामात झाले व्यस्त

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर**

**शिरूरआनंतपाळ** : तालुक्यातील येरोळ व परिसरातील गावामध्ये जुन महिण्यात पडलेल्या पावसावर पिकांची उगवण चांगल्या क्षमतेने झाली असून शेतकरी वर्ग कोळपणीच्या कामात व्यस्त झाला आहे. यावर्षी पिकांची पेरणी होण्यापूर्वी चांगला पाऊस झाला होता. त्या पावसामुळे शेतात असलेल्या ओलीवरच खरिपाची पिके चांगल्या पद्धतीने उगवली आहेत. त्या पिकांना भर चांगली व्हावी, पिके जोमदार यावीत, या उद्देशाने सर्जा-राजाच्या जोडीने शेतकरी पिकांची कोळपणी करित असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. काही ठिकाणी सोयाबीनमध्ये जास्त प्रमाणात तण उगवल्याने तणनाशक औषधाची फवारणी सुरु असुन सोयाबीनच्या पिकात अंतर्गत कामे जोमाने सुरू झाली आहेत. येरोळ गावासह परिसरातील सुमठाणा, पांढरवाडी, हानमंतवाडी, बोळेगाव, कारेवाडी, धामणगाव, चांबरगा आदी गाव परिसरात खरिपाची सोयाबीन, तूर, मूग, ज्वारी, उडीद आदी पिके शेतात घेतली जात आहेत. काही भागांत सोयाबीनची उगवण झाली नसल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याचे संकट ओढवले आहे.

जुनच्या पंधरा तारखेपर्यंत पेरणी झालेल्या पिकांची उगवण चांगली झाली असली तरी आता पिकांना मोठ्या पावसाची गरज आहे. जून महिना संपला आणि जुलै महिन्याचा पहिला आठवडा संपला तरी देखील मोठा पाऊस पडत नाही.




रोज येणारे ढगाळ वातावरण कधी तरी पडणारा रिमझीम पावसाच्या सरी पडत असल्या तरी पिक मोठे झाल्याने या पिकांना मोठ्या पावसाची नितांत गरज असल्याची आपेक्षा शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पोलीस स्टेशन पोफाळी अंतर्गत जगापूर येथे जुगार अड्डयावर धाड

## जुगार खेळणाऱ्या कडून पोलिसांवर दगड फेक

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**/ राजू गायकवाड**

पोलीस स्टेशन पोफाळी अंतर्गत येणाऱ्या जगापूर फाट्यावर एका शेतामध्ये जुगार खेळणाऱ्या एकूण अठरा जणांवर विविध कलमा अंतर्गत पोलीस स्टेशन पोफाळी येथे अनेक गुन्हे दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली, याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. 07/07/2025 रोजी रात्री 10 च्या दरम्यान सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हर्षवर्धन बि.जे. उपविभाग पुसद यांना माहिती देवून तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमान गायकवाड सा. उपविभाग उमरखेड यांचे लेखी आदेशाने व मा. पोलीस अधिक्षक सा. यांना माहिती देवुन त्यांच्या परवानगीने मिळालेल्या गोपनिय माहिती वरुन पोलीस स्टेशन पोफाळी व उपविभागीय पो,अधिकारी पुसद यांच्या कार्यालयातील कर्मचारी यांनी जगापूर फाटा येथे शेतात जुगार खेळणाऱ्या कार्यवाही केल्याची घटना घडली असून यामध्ये कायदेशीर कर्तव्य पार पाडत असताना काही इसमांनी पोलिसांची कॉलर पकडून शासकीय कामात अडथळा निर्माण करून पोलिसांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत ,दगड फेक केल्याची फिर्याद
पोउपनी सुरेश विठ्ठल शिंदे वय 55 वर्ष यांच्या फिर्यादी वरून दिपक भाऊराव जयस्वाल वय 45 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद, 2) बाळासाहेब यादवराव देशमुख वय 50 वर्ष रा. जगापुर ता. पुसद 3) राहुल गौतम कांबळे वय 27 वर्ष रा. शेबाळपिंपरी ता. पुसद 4) संघपाल दिपक जोगदंड वय 29 वर्ष रा. दगडधानोरा ता. पुसद 5) पंजाब दिनाजी ढोणे वय 50 वर्ष रा. ईसापुर धरण ता. पुसद 6) शेख वसीम शेख खाजा वय 38 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 7) उत्तम गोविंदा मासोळकर वय 44 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 8) तानाजी अंबादास भोपळे वय 55 वर्ष रा. पोफाळी ता. उमरखेड 9) समिर खान नुरखान पठाण वय 31 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 10) आकाश वाघु मनवर वय 30 वर्ष रा. सावरगांव बंगला ता. पुसद 11) अक्रम खान कलीम खान वय 20 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 12) शेख अमिर शेख फारुख वय 25 रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 13) शेख हुसेन शेख मुन्नीम वय 38 वर्ष रा. शेबाळपिंपरी ता. पुसद 14) सोमनाथ विनायक सूर्यवंशी वय 18 वर्ष रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद 15) शे. मोईन शे. मुजम्मील डांगे 16) शे. जाबीर शे. साबीर 17) सै. इब्राहीम सै. अकबर 18) मोशा (मतीन पैलवानचा भाऊ पुर्ण नाव माहित नाही) व इतर 2 ते 3 अनोळखी इसम असे एकूण 20 ते 21
जणांवर कलम 132, 121(1), 125, 189(1), 191(2), 191(3), 190, 221, 224, 115 (2) भारतीय न्याय संहीता सहकलम 4, 5 महाराष्ट्र जुगार कायदा सहकलम 135 म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याची माहिती पोफाळी पोलीस स्टेशन यांच्या कडून देण्यात आली आहे,सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हर्षवर्धन बि.जे. उपविभाग पुसद यांना माहिती देवून तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमान गायकवाड सा. उपविभाग उमरखेड यांचे लेखी आदेशाने व मा. पोलीस अधिक्षक यांच्या आदेशानुसार पोउनी विठ्ठल शिंदे,पोलीस हवालदार सुनील मदने, शंकर,टाळीकोटे, राहुल रोकडे,अजय गावंडे, सयद जुनेद अली,यांनी सदरची कार्यवाही केली , या कार्यवाही मध्ये दोन मोटरसायकल, किंमत 1 लाख व नगद 8 हजार 40 रुपये असा एकूण 108040 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला,यामधील आरोपी फरार असून आरोपींचा शोध पोफाळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार पंकज दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे,

# आषाढी पौर्णिमेनिमित्त हरसूलच्या महानुभाव आश्रमात देवपूजा वंदन

## दिडशे वर्षांपेक्षा अधिक जुने महानुभाव पंथीय मंदिरात भाविक लावणार हजेरी

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

सुमारे दिडशेपेक्षा अधिक वर्षांपुर्वीच्या असलेल्या व ईश्वर अवतारचा स्पर्श झालेल्या पवित्र पाषाणाला वंदन करण्यासाठी तालुक्यातील हरसूल येथील श्रीदत्त मंदिर महानुभाव आश्रमात आषाढी पोर्णिणेनिमित्त गुरुवारी दि. १० जुलै रोजी भक्तगण येणार असून यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महानुभाव पंथीय साधू- संत, महंत, भिक्षुक, वासनिक, परमार्ग सेवक यांची मांदियाळी यावेळी जमणार आहे. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी अवतार धारण करून अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या दीन- दुबळ्या समाजाला ज्ञान दिले. सर्वसामान्यांना समजेल, रुचेल, अशा



मराठी भाषेतून निरुपण करून मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान मिळवून दिले. मराठीतील आद्यग्रंथ लिळाचरित्र होय. या सर्वज्ञांच्या तत्वज्ञानाला अनुसरून महानुभाव पंथीयामध्ये आचरण केले जाते. ठिकठिकाणी आश्रमांची स्थापना करण्यात आली आहे. असेच हरसूल येथेही दिडशे वर्षांपेक्षा अधिक जुने महानुभाव पंथीय मंदिर- आश्रम आत्ताही अतित्वात आहे. येथे आषाढी पौर्णिमेनिमित्त मुख्य देवपूजा म्हणजे प्रसाद वंदन होणार आहे. यासाठी दूर- दूरवरून भक्तगण या प्रसाद वंदनाचा लाभ घेण्यासाठी हरसूल येथील श्री दत्त मंदिरात मोठ्या संख्येने गर्दी करत असतात. या कार्यक्रमाकरिता महंत माधवराज बाबा लाड यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील व गावातील भक्त मंडळी अथक परिश्रम घेत आहे. मंदिरात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी देवपूजा वंदनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून आषाढी पौर्णिमेनिमित्त आयोजित देवपूजा वंदनाच्या कार्यक्रमाचा सदभक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**श्रीदत्त खांडीवर तळेगावकर व जिंतूरकर पिढीतील देवपूजा**

विद्वान पंडित विश्वनाथ व्यासांनी शके १४४० ते १४५० च्या सुमारास अहोरात्र नामस्मरण केले. त्यावेळी त्यांना विविध वेशात चहुयुगी अवतार श्रीदत्तात्रेय प्रभूंचे दर्शन झाले. ज्या ज्या ठिकाणी दर्शन झाले, त्या ठिकाणी एकूण बारा खांडींची स्थापना केली. श्रीक्षेत्र माहूरच्या सभोवताली माहूरपासून कमी अधिक बारा कोसांचे अंतरावर बारा खांडीची स्थापना करण्यात आली. त्या बारा खांडीपैकी असलेल्या दिग्रस येथील श्रीदत्त खांडी देखील गावातीलच तपस्वीनी रुपाईसा तळेगावकर यांची भालोदकर- तळेगावकर व जिंतूरकर पिढीतील देवपूजा सोडण्यात येणार असून देवपूजा वंदनाचा कार्यक्रम होणार आहे.

# यशवंत होळकर विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार -पालक मेळावा व वृक्षारोपण उत्साहात-

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार**
**प्रतिनिधी**




येथील यशवंत होळकर विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पालक मेळावा व वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक माणिक कातखडे तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार घोळवे, पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार युवराज सोनवणे, प्रसिद्ध व्यापारी बबन, भाजपा युवा नेते माऊली पानसंबळ हे उपस्थित होते. यावेळी बोलताना तहसीलदार घोळवे म्हणाले, "जगात कोणालाही काहीही फुकट मिळत नाही. यश मिळवायचं असेल तर कठोर परिश्रम करावे लागतात. सध्या 'वेळ नाही' हे कारण विद्यार्थ्यांनी दूर सारावे. ज्ञान मिळवण्यासाठी सतत जागरूक राहावे व अज्ञानाच्या मार्गावर नेणाऱ्यांना ओळखणेही तितकेच महत्त्वाचे आहे." कार्यक्रमाची सुरुवात महान नेत्यांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली. विद्यार्थिनींनी सुमधुर स्वागत गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमास कानोबाचीवाडीचे माजी सरपंच बबनराव मोरे, आजिनाथ कदम, नवनाथर सव्वाशे, आजिनाथ गवळी, रंजीत कदम, संतोष सव्वाशे, दादा मोरे, भोंडवे, सुनील चव्हाण, सायकड ज्ञानदेव , सुरेश राऊत, काळे विजय, गंभीरे , श्रीमती ससाने तसेच जायभाय मॅडम यांच्यासह मोठ्या प्रमाणात पालकवर्ग व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावी पद्धतीने काळे सर यांनी पार पाडले तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ गुजर यांनी उपस्थितांचे आभार मानले. वृक्षारोपण उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण आणि पर्यावरण या बाबत प्रेरणा निर्माण केली असून, पालक-शाळा सुसंवादाचे सुंदर उदाहरण घडले आहे.

# आसेगाव पोलीस स्टेशन परिसरात अवैध दारू गुटखा विक्री.!

## ठाणेदार इंगळे घेत आहेत झोपेचं सोंग.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या 50% खेड्यामध्ये तसेच आसेगावात ठीक ठिकाणी मिळते देशी भिंगरी गावठी दारू वरून खुलेआम गुटखा विक्री होत असल्याची तक्रार सर्वच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. आसेगाव सर्वच बाबतीत अव्वल आहे. तसेच दोन नंबरच्या धंद्यातही अव्वल आहे. युवक व्यसनाधिकडे वळत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आलेली आहे.मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव ग्रामीण बाजारपेठ आहे.या ठिकाणी विविध खेडेगावाचे लोक विविध कामासाठी दर दिवशी येत असतात.त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलिसांसह सर्व संबंधित यंत्रणांकडून योग्य उपाययोजना होणे आवश्यक आहे.परंतु तसे होत नाही. नावालाच बंदी अवैध धंद्याची संधी अवैध धंद्याची कलाच न्यारी आसेगाव भागातही सुरू दुकानदारी.त्यामध्ये थेट पोलिसांची भागीदारी.अशातला हा प्रकार दिसून येत आहे.तथापि या ठिकाणी अवैध दारू विक्री





सह प्रतिबंधित गुटख्याची सुद्धा खुली विक्री होत असल्याची सामान्य जनतेत खमंग चर्चा आहे. या गावठी दारू वाल्यांना व गुटखा वाल्यांना नेमका कोणाचा आशीर्वाद समजायचे असा प्रश्न उपस्थित होतो.?

# रायगड कोर्लई किनाऱ्यावर आढळलेल्या संशयित बोट प्रकरणात !

## पोलिसांकडून मोठा खुलासा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

रायगड कोर्लई समुद्र किनाऱ्यावर संशयास्पद बोट आढळल्याच्या वृत्ताने संपूर्ण परिसरात ऐकाएकी खळबळ माजली होती. घटनास्थळी कोणतीही बोट प्रत्यक्षपणे न सापडल्याने सुरुवातीला संभ्रम निर्माण झाला. मात्र नौदलाच्या रडारवर आढळलेल्या माहितीच्या आधारे सुरक्षायंत्रणांनी शोधमोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्राथमिक अंदाजानुसार ही बोट खोल समुद्रात असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर रायगड पोलीस आणि अन्य सुरक्षा यंत्रणांनी तातडीने या मोहिमेस प्रतिसाद दिला. हेलिकॉप्टरच्या साहाय्याने समुद्रात शोध घेत असताना



तपासादरम्यान 'मुकद्दर बोया 99' नावाची पाकिस्तानी मासेमारी बोट रडारवर असल्याचे स्पष्ट झाले. ही बोट वादळामुळे पाकिस्तानमधील कराचीकडून भारतीय जलसीमेत वाहून आल्याचा अंदाज नौदलाने वर्तवला आहे. मात्र प्रत्यक्षात रेवदंडा परिसरात आढळलेली वस्तू ही बोटीचा एक छोटा भाग होता. सबंधित बोट ही पाकिस्तानच्या कराचीमध्येच आहे. हे या वेळी स्पष्ट झाले मासेमारी बोटीचा बोया असल्याने त्याला जीपीएस ट्रॅकर आहे. या ट्रॅकरमुळेच भारतीय नौदलाने बोटीची ओळख पटवली आहे. मात्र मूळ बोट पाकिस्तानात असून बोटीचा काही अवशेष भारतात वाहून आल्याचं निष्पन्न झालं आहे. तरीही खबरदारी म्हणून पोलिसांनी पूर्ण रायगड जिल्हा विशेष मोहीम राबवत तपास काढला मात्र काळजी करण्यासारखे कारण नाही, रायगड पोलिसांकडून या वेळी सांगण्यात आले. 52अधिकारी आणि 600 पोलिसांच्या टीमने जिल्हा पिंजून काढला. GPS ट्रॅकरच्या माध्यमातून बोटीची ओळख पटवली गेली आणि मूळ बोट पाकिस्तानात असल्याची खात्री झाली. नौदल व पोलिसांनी तपासाअंती स्पष्ट केले की सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही धोका नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे प्रशासनाने आवर्जून सांगण्यात आले आहे.

# कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तरुण व्यक्तींना "कोकण युवा सन्मान पुरस्कार २०२५" पुरस्काराने होणार गौरव

## आम्ही कोकणकर पुरस्कृत कोकण सन्मान सोहळा १३ जुलै२०२५ रोजी दादरच्या श्रीछत्रपती शिवाजीमहाराज नाट्य मंदिरात

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

कोकणच्या मातीतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तुत्वान व्यक्तींना एकत्र आणत आणि त्यांच्या कार्याचा गौरव करत , आम्ही कोकणकर संघटनेच्या वतीने कोकण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रविवार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता श्री शिवाजी नाट्यमंदिर , दादर (मुंबई) येथे संपन्न होणार आहे. आम्ही कोकणकर ही संघटना गेली दहा वर्षे कोकणातील तरुण पिढीला एकत्र आणत , कोकणच्या सांस्कृतिक , सामाजिक आणि कलात्मक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे. विशेषत: कोकणातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, त्यांना योग्य संधी मिळून देण्यासाठी ही संघटना सातत्याने कार्यरत आहे. "कोकण सन्मान सोहळा" या कार्यक्रमाद्वारे कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तरुण व्यक्तींना "कोकण युवा सन्मान पुरस्कार २०२५" हा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात येणार आहे. कार्यक्रमात धमाल, मस्ती, कॉमेडी, प्रबोधनपर, मनोरंजन आणि कोकणवासीयांसाठी खास सांस्कृतिक सादरीकरण पाहायला मिळणार आहे.या सोहळ्यात मनोरंजन म्हणून गर्जना- कहाणी हिंदुत्वाची ही नाट्यकला कृती दाखवण्यात येणार आहे. कोकण सन्मान सोहळा रसिक प्रेक्षकांसाठी मोफत असून कोकणवासीयांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावेअसे आव्हान संघटनेचे संस्थापक / लेखक /दिग्दर्शक कृष्णा नंदा शांताराम येद्रे यांनी केले आहे.चला एकत्र येऊन साजरा करूया उत्सव कोकण संस्कृतीचा..!कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून प्रवेशिका व अधिक माहितीसाठी ९७७३१४२८१९ /८६५२१४१५६१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान करण्यात आले आहे.







# वाशिम येथे विद्युत अधिकारी व कर्मचारी व कामगार संघटनेचा संप यशस्वी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

महाराष्ट्र राज्य वीज कामगार,अभियंते, अधिकारी संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली दिनांक ९ जुलै २०२५ रोजी राज्यातील ८६,००० वीज कामगार,अभियंते,अधिकारी व कंत्राटी कामगार यांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. दि.०४ जानेवारी २०२३ रोजी वीज कामगार संघटनांनी एकत्र येऊन महाराष्ट्र मध्ये समांतर वीज वितरणाचा परवाना महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रात अदानी व इतर खाजगी भांडवलदारांना देऊ नये या मागणी करता संप पुकारला होता.संपाच्या पार्श्वभूमीवर कामगार संघटनांच्या नेत्या समवेत सह्याद्री अतिथी गृहामध्ये चर्चा करताना महाराष्ट्र सरकारचे तत्कालीन ऊर्जा व उपमुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी ४ जानेवारी २०२३ रोजी राज्य सरकारच्या मालकीच्या सरकारी तिन्ही वीज कंपन्या कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण करणार नाही. उलट त्यांना आर्थिक मदत करून सक्षम करू असे कामगार संघटना नेत्याबरोबर पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते. मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी खाजगीकरण करणार नाही हा कामगार संघटनांना दिलेला शब्द फिरवत वीज कंपन्यामध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु केल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असून विज कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.देशभरातील सार्वजनिक विविध कंपन्यांचे



खाजगीकरण केंद्र व विविध राज्य सरकारने करत असल्यामुळे ९ जुलैला देशातील २७ लाख वीज कर्मचाऱ्यांनी केंद्र सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणाच्या विरोधात संपावर जात आहे.म्हणून त्याच दिवशी महाराष्ट्रातील वीज कर्मचाऱ्यांनी सुद्धा संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.
महाराष्ट्र सरकारच्या महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रामध्ये अनेक खाजगी भांडवलदाराने डिस्ट्रीब्यूशन लायसन्स मागितलेली आहे.याबाबतची सुनावणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे २२ जुलैला होणार आहे.तसेच महावितरण कंपनीने ३२९ उपकेंद्रे निविदा काढून खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. महापारेषण कंपनीत २०० कोटीच्या वरील सर्व कंत्राटे खाजगी भांडवलदारांना देण्याकरिता प्रक्रिया सुरू केली आहे.पारेषण कंपनीने मार्केटमध्ये शेअरलिस्टिंग करावे असे राज्य सरकारने निर्देश दिलेले आहे. निर्मिती कंपनीचे जलविद्युत केंद्र खाजगी भांडवलदारांना देण्याचा घाट राज्य सरकारने घातलेला आहे.वीज ग्राहकाच्या समंती शिवाय राज्यभर २ कोटी २५ लाख ६५ हजार स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची प्रक्रिया खाजगी भांडवलांना दिलेले असून दहा वर्ष देखभाल दुरुस्ती खाजगी भांडवलदाराकडे राहणार आहे.वरील सर्व घटनाक्रम हा खाजगीकरणाचा असून याला तीव्र विरोध कृती समिती मध्ये सहभागी संघटनांनी केलेला आहे. निर्मिती,पारेषण व वितरण या तिन्ही वीज कंपन्यांमध्ये ४० हजाराच्या वर स्थायी पदे रिक्त आहेत. ही सर्व रिक्त पदे भरावी व ही रिक्त पदे भरती करताना कंत्राटी कामगारांना प्रथम सामावून घ्यावे अशी आग्रही मागणी कामगार संघटनांची आहे. कंत्राटी कामगाराचे आर्थिक व सामाजिक शोषण सरकारी वीज कंपन्याकडून करण्यात येत आहे ते बंद करावे ही मागणी प्रामुख्याने करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व आताच्या निर्मिती,पारेषण व वितरण विज कंपन्या मधील कामगार,अभियंते व अधिकारी यांना कोणतीही पेन्शन नाही.वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करावी ही मागणी प्रामुख्याने कृती समितीने केलेली आहे. पगारवाढ करार करारानंतर प्रलंबित असलेल्या प्रश्नावर अनामली कमिटी गठीत करून तात्काळ चर्चा सुरू करून कारवाई करावी ही मागणी कृती समितीने केलेली आहे. कृती समितीने एकूण १४ मागण्या करीता हा संप पुकारलेला आहे. या संपामध्ये वाशिम जिल्ह्यातील बहुतांश कामगार अधिकारी अभियंता सहभागी झाले आहेत.वाशिम जिल्ह्यात वीज कामगार अधिकारी अभियंता यांच्या कृती समितीच्या संपास पाठिंबा देणे करिता शरदचंद्र राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, उद्धव ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेश मापारी, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा वीज ग्राहक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू चौधरी, पत्रकार संघाचे माधवराव अंभोरे यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे..
या संपामध्ये तांत्रिक कामगार युनियन ५०५९, महाराष्ट्र राज्य स्टेट इले. वर्क्स फेडरेशन, संबोर्डिनेट इंजिनिअर असोसिएशन, इंटक, स्वाभिमानी वर्क्स फेडरेशन, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन आधी संघटना या संपात सहभागी होत्या.

युवक आधार



## झाडगाव येथे श्री संत लखाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव निमित्त संगीतमय रामकथेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



राळेगाव:-तालुक्यातील झाडगावचे आराध्य दैवत संत श्रेष्ठ श्री लखाजी महाराज पुण्यतिथी च्या अनुषंगाने ह. भ.प.सोनाली दीदीजी महाजन आळंदीकर यांच्या अमृतमय वाणी तुन सात दिवस अनेक धार्मिक कार्यक्रम सह भव्य संगीतमय रामकथेचे आयोजन केले आहेत. ज्यामध्ये ८ जुलै ते १५ जुलै पर्यत चालणाऱ्या कार्यक्रम मध्ये १० तारीख कलश स्थापना १४ जुलै संत लखाजी महाराज विदयालय झाडगाव चा अभिषेक राहील नंतर श्रीच्या पादुकाची पालखी मिरवणूक व नगर प्रदर्शना राहील,दिनांक १५ जुलै ला काल्याचे किर्तन ह. भ. प सोनाली दीदीजी महाजन यांचे आणि नंतर भव्य महाप्रसादाचे नियोजन राहील त्याच रात्री गावातील महाराष्ट्रची लोककला असलेले भारूड आणि विशेष गावातील कलाकार मुलांना स्टेज मिळावा त्यांचातील कलेचा विकास व्हावा या अनुषंगाने गावातील विजय महाराज,पवन महाराज,उमेश महाराज यांचा विनोदी भारूड कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमाची सांगता म्हणून दरवर्षी प्रमाणे श्री क्षेत्र नानाजी महाराज कापसी येथे कार्यक्रमाची सांगता होणार आहे.या संपूर्ण कार्यक्रमामध्ये दैनंदिन कार्यक्रम –सामुदायिक ध्यान, प्रार्थना हरिपाठ, गावातील महिलां–पुरुष भजनी मंडळाचे दुपारी ३ वाजता भजन वं सायंकाळी ७ वा रामकथा याप्रकारे दैनंदिन कार्यक्रम या पुण्यतिथी सोहळ्यात होणार आहेत तरी ८ ते १५ होणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवातील रामकथा, तसेच पालखी मिरवणूक, महाप्रसाद चा लाभ गावातील तसेच बाहेरगावातील भक्त मंडळींनी घ्यावा असे आव्हान या कार्यक्रमाचे आयोजक समस्थ ग्रामवासी झाडगाव यांच्या मार्फत करण्यात आलेले आहेत.

## शिरपूर पोलिसांची धाड. गोवंश जनावरांची हत्या करणाऱ्या 02.जनाविरुद्ध शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**




शिरपूर येथील इंदिरानगर येथे 06 जुलै रोजी. पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून धाड टाकून गोवंश जनावराची हत्या करणाऱ्या दोन जनाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांना माहिती मिळताच ठाणेदार केशव वाघ. पोलीस उपनिरीक्षक इम्रान पठाण. पो हे का. संदीप निखाडे. पो का. गणेश देशमुख. हरिहर गावंडे. रामा नागरे. व गृह रक्षक दलाचे सैनिक यांनी इंदिरानगर गाठले असता मिळालेल्या माहितीनुसार शेक लूकमान शेख बिराम. गुलाम हुसेन. गुलाम दस्तगीर. या दोन्ही आरोपीतांनी गोवंच जनावराची हत्या करून त्याचे मास. हाडे. शिंगे. खुरे. किंमत आठ हजार रुपये आरोपींनी त्यांच्या ताब्यातील जागेमधील एका प्लास्टिकच्या टाकीत भरून ठेवलेले मिळून आले. सरकार पक्षातर्फे पो हे का. संदीप निखाडे यांनी शिरपूर पोलीस ठाण्यात 06. जुलै रोजी फिर्याद दिली. फिर्यादीवरून शिरपूर पोलिसांनी शेख लू शेख बीराम.वय 40.वर्ष गुलाम हुसेन गुलाम दस्तगीर. वय 33. दोघेही रा. शिरपूर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम नुसार व विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार केशव वाघ. यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक इम्रान पठाण. हे करीत आहेत.

## महाराष्ट्रांत विवाहित महिलांचे अनैतिक संबंध वाढले, महिलांच च प्राधान्य, नंतर पलटी प्रियकराला जेलची वारी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

गेल्या काही दिवसांत अनैतिक संबंधात मोठी वाढ झाल्याचे चांगलेच दिसून येत आहे. तसेच अनैतिक संबंधातून हत्येच्याही घटना चांगल्याच समोर येत आहेत.. राज्यांत महिलांवर होणाऱ्या ४६,४५९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सध्या महाराष्ट्रांत महिलांचे (विवाहबाह्य संबंध) अनैतिक संबंधांचे प्रमाण चांगलेच वाढल्याचे दिसून येत आहे, ( विवाहबाह्य संबंधातून वाढ ) अलीकडे काही अहवालानुसार महाराष्ट्रांत महिलांचे विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. ( शिक्षणाचा आणि आर्थिक स्थौर्याचा संबंध ) काही अभ्यासातून असे समोर आले आहे की, उच्चशिक्षित आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी महिलांमध्ये विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण जास्त आहे. (पुरुषांच्या तुलनेत कमी) जरी महिलांमध्ये विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण वाढत असले, तरी ते पुरुषांच्या तुलनेत अजूनही कमीच आहे. ( समाजाचा दृष्टिकोन ) महिला सक्षमीकरण आणि जनजागृती हक्कांबद्दल वाढत असताना त्यांच्या भावना आणि गरजाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र मध्ये महिलांच्या विवाहबाह्य संबंधांमध्ये वाढ होत आहे. ( निष्कर्ष ) हे खरे असले, तरी या वाढीमागील कारणे आणि समाजांचा दृष्टिकोन याचा विचार करणे आवश्यक आहे. ( विवाहबाह्य संबंध म्हणजे काय? ) लग्न झालेल्या पत्नी पती यांनी व्यतिरिक्त परस्त्री किंवा परपुरुषासोबत शारीरिक संबंध ठेवण्यास संबंध विवाहबाह्य संबंध असे म्हटलं जातं. याला इंग्रजीमध्ये अडल्ट्री असे म्हणतात

## उरण खोपटे गावांतील हरहुन्नरी व्यक्तिमत्व अनंत ठाकूर काळाच्या पडद्याआड.

### नाट्य व क्रीडा क्षेत्रात शोककळा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



सामाजिक कार्यात भरीव कामगिरी करणारे उरण तालुक्यातील खोपटे गावांतील द.पी. पाडा येथील अनंत धनाजी ठाकूर(67)यांचे नवी मुंबई येथील अपोलो रुग्णालयात उपचार सुरू असतानाच दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच राजकीय, सामाजिक, नाट्य, क्रीडा, सांस्कृतिक व धार्मिक अशा विविध क्षेत्रातील त्यांच्या चाहत्यांनी खोपटे येथील त्यांच्या निवासस्थानी हजेरी लावून त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. घरातील कर्ता हरहुन्नरी पुरुष हरपल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचे सावट पसरले आहे. समाजाशी बांधिलकी असलेल्या या हरहुन्नरी नेतृत्वाने पूर्वविभागासह संपूर्ण उरण तालुक्यात आपल्या सामाजिक कार्याचा ठसा उमठविला आहे. मागील ७ वर्षांपूर्वी एन.ए.डी.करंजा येथील एम.एस.विभागातून टेकनेशन्स पदावरून ते निवृत्त झाले होते. धार्मिक कार्यासह शेतकरी आंदोलनात सहभागी होऊन,तरुणांना प्रोत्साहित करणाऱ्या ठाकूर यांच्या विलक्षण कार्याची तालुक्यात ओळख होती.त्यांच्या पश्चात पत्नी, पुत्र, कन्या, सून, जावई,भाऊ आणि नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# उरणातील वारकऱ्यांनी घेतला वारीचा आनंद.

## पाऊले चालती पंढरीची वाट

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्ताने उरण तालुक्यातील विठू माऊलीच्या भाविक भक्तांनी गेल्या अनेक वर्षाची वारीची परंपरा जपत यावर्षीही उरण परिसरातील चिरनेर, दिघोडे, विंधणे, बोकडविडा पागोटे अशा अनेक गावातील, विविध क्षेत्रातील मित्रमंडळी एकत्र येत पंढरपूरच्या वारीचा आनंद घेतला. या साठीउरण एसटी आगाराच्या आगार प्रमुखांनी वारकऱ्यांच्या वारीसाठी एसटीच्या बसची व्यवस्था केली होती. आषाढी एकादशी हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र अशी तिथी आहे. विठू माऊली या शब्दातच मोठा आधार आहे. हे जाणून या वारीच्या भक्तीच्या महासागरात विविध जाती धर्माचे लाखो लोक एकत्र येऊन, या वारीचा आनंद घेतात. शुक्रवारी (दि. 5) रोजी उरण तालुक्यातील दिघोडे येथून ही वारी प्रस्थान झाली. यावेळी या वारीत प्रसिद्ध दिग्दर्शक संतोष ठाकूर, ज्येष्ठ दिग्दर्शक प्रमोद पाटील, सामाजिक कार्यकर्ते महेश लोहाटे, सामाजिक कार्यकर्ते कांचन ठाकूर सामील झाले होते. त्यांच्याच हस्ते वारीचे प्रस्थान करताना, श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. विशेषताः अगदी दरवर्षी वारकऱ्यांच्या सेवेत समाधान




मानणाऱ्या कांचन ठाकूर, महेश लोहाटे, संतोष ठाकूर, विंधण्याचे जोशी, कृष्णा कोळी, श्वेता कोळी, सुषमा कोळी, सोनी कोळी, सार्थक कोळी, शेखर कोळी,कंडक्टर अशोक कोळी तसेच वारीत सामील झालेल्या महिलावर्गांनी वारकऱ्यांसाठी पुरणपोळी, पाणी, आणि नाश्त्याची चांगली व्यवस्था करून वारकरी भक्तांचे आशीर्वाद घेतले. सुषमा कोळी, श्वेता कोळी, सोनी कोळी, सार्थक कोळी, शेखर कोळी यांनी टाळ मृदुंग वाजवीत भजनातून वारकऱ्यांना भक्ती गीतांचा आनंद दिला. विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल, ग्यानबा तुकाराम, राम कृष्ण हरी अशा नामस्मरणातून जयघोष करीत उरणच्या या वारकऱ्यांनी वारीच्या भक्तीचा आनंद लुटला. मानवी जीवनात ईश्वरी प्रेमाची अनुभूती सांगणारा हा वारीचा अनुभव आम्हाला ठायी,ठायी आला असल्याचे दिग्दर्शक संतोष ठाकूर, ज्येष्ठ दिग्दर्शक प्रमोद पाटील, सामाजिक कार्यकर्ते कांचन ठाकूर यांनीआमच्या प्रतिनिधीला आपली प्रतिक्रिया देतनासांगितले. मानवी जीवनात ईश्वरी प्रेमाची अनुभूती सांगणारा हा वारीचा अनुभव आम्हाला ठायी,ठायी आला असल्याचे दिग्दर्शक संतोष ठाकूर, ज्येष्ठ दिग्दर्शक प्रमोद पाटील, सामाजिक कार्यकर्ते कांचन ठाकूर यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** तालुक्यातही येवती येथील तलाठी कार्यालयात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२५ अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर मा. उपविभागीय अधिकारी राळेगाव व तहसीलदार राळेगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ७ जुलै रोजी ग्रामसभेचे आयोजन करून गावात व परिसरातील नागरिकांमध्ये व्यापक प्रसिद्धी देण्यात आली होती. ग्रामस्थांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले व लाभार्थ्यांची यादीही अंतिम करण्यात आली.शिबिरात महसूल विभागामार्फत एकूण ४०४ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यामध्ये उत्पन्न, जात, अधिवास, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्रे, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी आदींचा समावेश होता. आधार दुरुस्तीसाठी कॅम्प लावण्यात आला होता ज्याचा लाभ अनेक नागरिकांनी घेतला.आरोग्य विभागाच्या वतीने ६८ रुग्णांची तपासणी करून औषधांचे वाटप करण्यात आले, तर कृषी विभागाने १७ शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले. ग्रामपंचायतीमार्फत ७९ रहिवाशांना आवश्यक




दाखले देण्यात आले.येवती तसेच आजूबाजूच्या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ एका ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून महसूल प्रशासनाचे व शासनाचे आभार मानले त्यावेळी मंडळ अधिकारी पांडे, कोळी तलाठी येवती , निलेश देवळे तलाठी हजर होते

## महाराष्ट्रांत विवाहित महिलांचे अनैतिक संबंध वाढले, महिलांच च प्राधान्य, नंतर पलटी प्रियकराला जेलची वारी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

गेल्या काही दिवसांत अनैतिक संबंधात मोठी वाढ झाल्याचे चांगलेच दिसून येत आहे. तसेच अनैतिक संबंधातून हत्येच्याही घटना चांगल्याच समोर येत आहेत.. राज्यांत महिलांवर होणाऱ्या ४६,४५९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सध्या महाराष्ट्रांत महिलांचे (विवाहबाह्य संबंध) अनैतिक संबंधांचे प्रमाण चांगलेच वाढल्याचे दिसून येत आहे, ( विवाहबाह्य संबंधातून वाढ ) अलीकडे काही अहवालानुसार महाराष्ट्रांत महिलांचे विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. ( शिक्षणाचा आणि आर्थिक स्थौर्याचा संबंध ) काही अभ्यासातून असे समोर आले आहे की, उच्चशिक्षित आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी महिलांमध्ये विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण जास्त आहे. (पुरुषांच्या तुलनेत कमी) जरी महिलांमध्ये विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण वाढत असले, तरी ते पुरुषांच्या तुलनेत अजूनही कमीच आहे. ( समाजाचा दृष्टिकोन ) महिला सक्षमीकरण आणि जनजागृती हक्कांबद्दल वाढत असताना त्यांच्या भावना आणि गरजाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र मध्ये महिलांच्या विवाहबाह्य संबंधांमध्ये वाढ होत आहे. ( निष्कर्ष ) हे खरे असले, तरी या वाढीमागील कारणे आणि समाजांचा दृष्टिकोन याचा विचार करणे आवश्यक आहे. ( विवाहबाह्य संबंध म्हणजे काय? ) लग्न झालेल्या पत्नी पती यांनी व्यतिरिक्त परस्त्री किंवा परपुरुषासोबत शारीरिक संबंध ठेवण्यास संबंध विवाहबाह्य संबंध असे म्हटलं जातं. याला इंग्रजीमध्ये अडल्ट्री असे म्हणतात



# नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. श्री. अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे ठरले असून, आमदार मा. श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड उत्तरमधील सर्व तालुकाअध्यक्षांनी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. या पार्श्वभूमीवर, आज नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक जिल्हाध्यक्ष मा. बाळासाहेब पाटील रावणगावकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांकडून त्यांच्या तालुक्यातील पक्ष संघटनेच्या कामाचा सविस्तर




आढावा घेण्यात आला. तसेच पक्षबांधणी अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक त्या सूचना जिल्हाध्यक्षांनी दिल्या. या बैठकीस राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष आनंदभाऊ डांगे, भोकर विधानसभा अध्यक्ष शिवाजीराव लगलूदकर, हदगाव विधानसभा अध्यक्ष एकनाथ पाटील, भोकर तालुका अध्यक्ष राजेश्वर देशमुख, सुरेशराव बिल्लेवाड, अर्धापूर तालुका अध्यक्ष आत्माराम कपाटे, शहर सरचिटणीस प्रवीण घुले, हिमायतनगर तालुका अध्यक्ष अभिषेक लुट्टे, मुदखेड तालुका अध्यक्ष आनंदराव टिप्परसे, हदगाव तालुका अध्यक्ष निळकंठ पाटील, माहूर तालुका अध्यक्ष अमित राठोड, अमोल मालेगावकर, किनवट तालुका अध्यक्ष संजय सिडाम, भोकर युवक तालुका अध्यक्ष गजानन पाटील, कार्याध्यक्ष सय्यद जफर, गिरीश पाटील रावणगावकर तसेच जिल्ह्यातील सर्व फ्रंटल सेलचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निफाड वकिल संघातर्फे निषेध नोंदवत वकिल संरक्षण कायद्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड येथे दि. ८ रोजी निफाड वकील संघा तर्फे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन देण्यात आले. नाशिक येथील अँड रामेश्वर बोराडे यांचेवर झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवत वकिल संरक्षण कायद्याची मागणी करण्यात आली वकिलांवर विविध माध्यमातुन सतत हल्ले होत आहेत या हल्यामुळे वकिलांचे जिविताला धोका निर्माण होत आहे वकिलांचे संरक्षणासाठी कायदा पारित करावा तसेच वकिलांवरील हल्लेखोरांना कठोर शासन करावे या मागणीसाठी निफाड वकिल संघाचे वतीने निषेध सभा घेऊन तहसिलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन देण्यात आले यावेळी अँड इंद्रभान रायते अँड मधुकर व्यवहारे अँड



निफाड ;– नाशिक येथील अँड रामेश्वर बोराडे यांचेवरील हल्लेखोरांना कठोर शासन करावे वकिल संरक्षण कायदा पारित कारावा असे निवेदन तहसिलदार विशाल नाईकावाडे यांना देतांना वकिल संघाचे अध्यक्ष अँड प्रविण ठाकरे ,अँड इंद्रभान रायते अँड अशोकराव निकम ,अँड मधुकर व्यवहारे आदी

अण्णासाहेब भोसले अँड अशोकराव निकम अँड सुनील उगलमुगले ,अध्यक्ष अँड प्रविण ठाकरे सचिव अँड रामनाथ शिंदे आदींनी मनोगतातुन वकिलांवरील हल्याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन वकिल संरक्षण कायदा पारित करावा असे नमुद केले वकिलांवरील हल्ल्याचा निषेध नोंदविला यावेळी निफाड वकिल संघाचे पदाधिकारी व वकिल मोठ्या संख्यने उपस्थित होते

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोशनगाव येथील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश ,सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे यांच्या हस्ते वाटप

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी**
**: गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद तालुक्यातील मौजे रोशनगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शालेय गणवेश वाटप सन 2025– 26 विद्यार्थांना एक गणवेश,एक जोडी बुट, दोन जोडी सॉक्स, सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, युवा नेते शालेय समिती माजी अध्यक्ष यादव पाटील जाधव, शालेय समिती अध्यक्षा आशा मेडेवार, मुख्याध्यापक देशपांडे सर, नागनाथ पाटील माळगे, ई.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय गणवेश साहित्य वाटप करण्यात आले.






भाऊसाहेब आण्णा भवर यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचा मुगगाव येथे सत्कार करुन शुभेच्छा देताना. आष्टी /पाटोदा /शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, विशाल आरसुळ सर, शंकर जाधव, जितेंद्र सांगळे, पत्रकार महेशर शेख, पत्रकार सय्यद रियाज, पत्रकार राहुल सोनवणे, संतोष घुमरे, मनोज कदम यांच्या सह इतर.

(छाया – दैनिक युवक आधार पाटोदा.)

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509





## पीएम श्री शाळा मुळेखंड शाळेच्या विद्यार्थ्यांनी लुटला पारंपारिक भात लावणीचा आनंद.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

रायगड जिल्हा म्हणजे भाताचे कोठार ओळखले जायचे त्यातल्या त्यात पेण, पनवेल,अलिबाग व उरण या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भात शेती केली जायची. परंतु हे तालुके समुद्रकिनारी असल्याने बरेचशी शेती ही खारफुटीने नष्ट झालेली दिसत आहेत तर उरण, पनवेल सारख्या तालुक्यांमध्ये सिडको आल्याने त्याचप्रमाणे जेएनपीटी सारखे बंदर असल्याने बरीचशी आज शेती जमीन ही विकासक व कंटेनर यार्ड साठी घेतली गेली आहे. त्यामुळे पारंपरिक भात शेतीचा व्यवसाय जवळ जवळ नष्ट होण्याच्या मार्गावर असून पुढील पिढीला या पारंपरिक व्यवसायाची माहिती होईल की नाही हे जाणण्यासाठी आज पीएम श्री शाळा मुळेखंड शाळेच्या मुलांनी मुळेखंड गावातील प्रगतशील शेतकरी श्री मनोज रमेश ठाकूर यांच्या शेतात पारंपारिक भात शेती लावणीचा आनंद लुटला त्याचप्रमाणे शेती कशा प्रकारे केली जाते नांगर बैल जोडी त्याचप्रमाणे शेतीची मशागत उकळणी, पेरणी, लावणी, बेननी, याची देखील माहिती मिळवली. शेतकऱ्यांसोबत माहिती घेत भाताच्या मुठी हातात घेऊन नांगरलेल्या शेतात उतरून शेतकरी व शिक्षकांसोबत प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी भात लावणी केली. या उपक्रमात पंचायत समिती उरण पी एम श्री शाळा समन्वयक वैशाली गावंड व शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर विषय शिक्षिका विद्या वाणी दिशा तांडेल अर्चना पाटील व या उपक्रमाचे नियोजन करणारे उपक्रम शील शिक्षक संजय होळकर यांनी सहभाग घेतला होता.शेवटी संजय होळकर यांनी मनोज ठाकूर कुटुंबाचे आभार मानले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मनसोक्त आनंद लुटला.

## गरजेपोटी घरांच्या नियमितीकरणाचा प्रश्न अद्याप अनुत्तरित, नऊ महिने उलटूनही अध्यादेश अंमलबजावणीविना

**दैनिक युवक आधार**
**उरण /प्रतिनिधी**

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात राज्य सरकारने नवी मुंबईती प्रकल्पग्रस्तांची बांधकामे नियमितीकरणासाठी सुधारित अध्यादेश काढला. परंतु नऊ महिने उलटले तरी या अध्यादेशाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा बांधकामाच्या एका याचिकेच्या सुनावणीदरम्यान नियमितीकरणाच्या प्रक्रियेची माहिती न्यायालयात अनुमती याचिकेने कळवा असे आदेश बजावल्याने राज्य सरकारने याविषयी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. परंतु मागील अनेक महिन्यांत राज्य सरकार याबाबतचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल करु शकले नाही.

राज्य सरकारने नियमितीकरणाच्या सुधारित अध्यादेशापूर्वी विधि विभागाचा सल्ला का घेतला नाही असा प्रश्न प्रकल्पग्रस्तांकडून विचारला जात आहे. विधानसभेच्या निवडणूका तोंडावर आल्यानंतरच प्रकल्पग्रस्तांची आठवण सत्ताधाऱ्यांना येते अशी संतापजनक प्रतिक्रिया प्रकल्पग्रस्तांकडून केली जात आहे. नवीमुंबईतील 95 गावांतील प्रकल्पग्रस्तांनी बांधलेली घरे नियमितीकरणाचे अध्यादेश राज्य सरकारने आतापर्यंत 2022 आणि 2024 अशा दोन वेळा जाहीर केले. मात्र प्रकल्पग्रस्तांचे एकही बांधकाम या अध्यादेशाप्रमाणे नियमित होऊ शकले नाही. 2007 साली सिडको महामंडळात गरजेपोटी बांधकाम नियमितीकरणासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला. या विभागाकडून गेल्या 18 वर्षात एकही घर नियमित करु शकले नाही. या विभागातील अधिकारी व कर्मचारी नेमके काय काम करतात, असा प्रश्न प्रकल्पग्रस्तांना पडला आहे.

# सतत मुसळधार पावसाने बळीराजाची चिंता वाढली

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**



**राळेगाव :-** तालुक्यातील दोन दिवसापासून सतत मुसळधार पावसामुळे बळीराजाची चिंता वाढताना झोप उडाली आहे असे दिसून येत आहे सुरवातीला मृग नक्षत्रात पावसाने दडी मारल्याने बळीराजावर दुभार पेरणीचे संकट ओढवले होते,त्यामुळे शेतकर् यावर कर्जाचा डोंगर कोसळला, तरी पण थोड्या दिवसाने आद्राच्या नक्षत्र रिम झिम पाऊस आल्याने पुन्हा बळीराजा नवचैतन तेवढा कर्जाचा डोंगर पचून आनंदाने काळ्या आईला हिरवा शालू नेसवायला सज्ज झाला,परंतु निसर्ग राजा मानायला तयार नाही दोन दिवसापून सतत मुसळधार पावसामुळे बळीराजाची चिंतेत पुन्हा वाढ केली,बी बियाणे व युरिया आणि खताच्या महागाईने आकाशाला झेप घेतली आहे,आता बळीराजाची चिंता खूपच वाढली असून झोप उडाली आहे,आता न्याय कोणत्या दरबारात न्यायचा कारण बळीराजाची बाजू घ्यायला व बाजू मांडायला कोणीच तयार नाही,बळीराजाला आशा होती की पावसाळी अधिवेशनात आपला भारत देश कृषी प्रधान म्हणून ओळखल्या जाते म्हणून पहिला मुद्धा बळीराजावर राहील पण तस काही घडताना दिसत नाही,आशाची निराशा होताना दिसत आहे बळीराजाच्या बाजूनी देव सुद्धा उभा राहताना दिसत नाही,म्हणून शेतकरी चिंता ग्रस्थ झाला आहे, कधी निसर्ग राजाचा प्रकोप,कधी बॅकचे ओझ तर कधी बोगस बियाणे घेऊन फसतो तर कधी युरीया खताचा तुटवडा सांगा साहेब आमचं चुकलं तरी काय? आम्ही शेतकरी म्हणून जन्म घेतला याचा गुन्हा झाला का? आम्ही फक्त नुसते भाषणापुरते शेतकरी राजा आहे का?असे अनेक प्रश्र उपस्थितीत करत आपली मनातली भावना व्यक्त करतांना शेतकरी दिसून येत आहे. या दोन दिवसापासून सतत मुसळधार पावसामुळे काही शेतकऱ्यांचे शेतमालाचे नुकसान झाले आहे तर प्रशासनाकडून काही नुकसान भरपाई व मदत मिळतील का? याकडे सर्व शेतकऱ्याचे लक्ष वेधले आहे हे विशेष.

## विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड च्या प्राचार्यपदी एच.एम.बेग यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने एच.एम.बेग सर यांची मुख्याध्यापक / प्राचार्य म्हणून तर आर.एस.अनुसे सर यांची उपमुख्याध्यापक म्हणून निवड केली आहे. या निमित्त क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे सचिव शाहीद कादरी सर, असरार खान सर आणि प्रा. डॉ.शशिकांत गायकवाड सर यांनी त्यांच्या सत्कार करुन अभिनंदन केले. व पुढील कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्यूनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक आयु.राजेंद्र गाडेकर सर, आयु.अमरापुरकर सर, आयु.नरवडे सर, आयु.रणजीत पिंगळे सर, आणि आयु.शेळके सर यांची उपस्थिती होती. आयु.एस.एस.उनबेग यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती.




# श्लोक मोटर्स या दुकानाचे पहिले वर्ष उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे प्रतिनिधी**

येथील श्री.रुपेश रमेश नागोठणेकर यांच्या मालकीच्या *श्लोक मोटर्स* च्या शोरूम ला मंगळवार दिनांक ०८ जुलै २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण झाले, स्वर्गीय आईसाहेब सौ.विजया (रजनी) रमेश नागोठणेकर यांनी एक वर्षापूर्वी रिबीन कापून या शॉप चे उद्घाटन केले होते, त्यांचे आशीर्वाद व आठवण आमच्या पाठीशी कायम राहील, तसेच दुकानाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त दुकानांमध्ये विशेष सवलती आणि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहकांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

रोहा तालुक्यातील नागोठणे शहरांमध्ये असलेले *श्लोक मोटर्स* च्या दुकानाला एक वर्ष पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यात आला. या निमित्ताने दुकानांमध्ये गणेश पूजन




करून तसेच केक कापून आनंद साजरा करण्यात आला,

एका वर्षात यशस्वी घोडदौड केली, माझ्यावर आत्तापर्यंत सर्व ग्राहकांनी जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी सर्वांचा शतशः ऋणी आहे त्याचप्रमाणे माझे ग्राहकच माझे जाहिरातदार आहेत आणि सर्वस्व आहेत अशी भावना यावेळी *श्लोक मोटर्स* चे मालक श्री. रुपेश रमेश नागोठणकर यांनी व्यक्त केली, तसेच भविष्यातही ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करू असे सांगितले.

या कार्यक्रमाच्या वेळी त्यांचे वडील श्री.रमेश नागोठणेकर, भाऊ तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्री. संतोष नागोठणेकर, विद्यार्थी उन्नती संघ अध्यक्ष श्री.दिपक वाडेकर,श्री. किरण नागोठणेकर,सहकारी फायनान्सर राहुल वाघमारे सर, श्री . संतोष घाग,वहिनी सौ.संज्योती संतोष नागोठणेकर,पत्नी सौ.रुणाली रुपेश नागोठणेकर,सौ.पुजा किरण नागोठणेकर, सौ.रेश्मा स्वप्नील शिर्के, सौ.अस्मिता विजय धाटावकर,सौ. स्वाती संजय कोल्हटकर तसेच बालवर्ग श्लोक,शुभ्रा,साई,राज, आरोही , अनन्या व कैवल्य सर्व नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते.

## पाटबंधारे विभाग वाशिम यांनी घेतली जलसमाधी आंदोलन कर्त्यांची तात्काळ भेट. आंदोलन कर्त्यांच्या मागण्या केल्या मान्य.

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

रिसोड तालुक्यातील कुकसा जोगेश्वरी धरणाच्या भिंतीवरील झाडे फांद्या तोडण्यासाठी शिवसंग्राम चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील बाजड यांनी दिले होते पाटबंधारे विभागाला निवेदन. आणि निवेदनाद्वारे 09.जुलै रोजी जलसमाधी आंदोलन करण्याचा शिवसंग्रामद्वारे इशारा सुद्धा दिला होता. त्याच अनुषंगाने 09.जुलै रोजी सकाळी दहा वाजता तात्काळ पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता वाशिम चव्हाण साहेब व चिखलीकर साहेब यांनी जलसमाधी आंदोलन कर्ते शिवसंग्राम चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील बाजड. तसेच शिवसेना वाशिम जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे. व जोगेश्वरी ग्रामपंचायतचे सरपंच दीपक पाटील वाळूकर व जोगेश्वरी. अंचळ. कुकसा. नेतंसा मांगुळ झनक. इत्यादी गावाच्या ग्रामस्थांच्या समोर जलसमाधी आंदोलनाची दखल घेऊन धरणाच्या भिंतीवरील 40% झाडे तोडण्यात आलेली आहेत सतत पाऊस सुरू असल्यामुळे झाडे तोडणे कठीण जात आहे तरी एक महिन्याची मुदत झाडे तोडण्यासाठी वाढवून देण्याबाबत लेखी पत्र आंदोलन करताना यावेळी कार्यकारी अभियंता चव्हाण साहेब वाशिम व चिखलीकर साहेब यांनी ग्रामस्थांना व आंदोलन कर्त्यास दिले. उपस्थित जनसमुदायांसोबत विचार विनिमय करून सदर जलसमाधी आंदोलन एक महिन्याकरिता स्थगित करण्यात आलेले आहे एक महिन्यांमध्ये दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही तर याच ठिकाणी सभा घेऊन जलसमाधी आंदोलन करण्यात येईल असे यावेळी आंदोलन करताना अधिकाऱ्यांना खडसावून सांगितले. परिसरातील जनसमुदाय यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता. धरणाच्या परिसरातील विविध समस्या यावेळी शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता समोर मांडल्या. सदर समस्याकडे सुद्धा लक्ष घालण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# स्मार्ट मीटर बसवणे त्वरीत थांबवा..राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट आक्रमक.

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना (अशोक ठोके)**

परतूर शहरात नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची सक्तीची प्रक्रिया महावितरण विभागाकडून सुरु करण्यात आली आहे याला नागरिकांचा तीव्र विरोध आहे. याबाबत राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी महावितरण परतूर कार्यालयास निवेदन देऊन ही प्रक्रिया थांबवण्याची मागणी केली.

परतूर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या वतीने दि.9



जुलै रोजी महावितरणचे अभियंता यांना निवेदन देण्यात आले निवेदनात म्हटले आहे की, ग्राहकांची परवानगी न घेता शहरात सध्या स्मार्ट मीटर बसवन्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे नागरिकांना दर महिन्याला २०० ते २५० युनिट वाढीव बिल आकारले जात आहे ग्राहकांना अन्याय सहन करावा लागत आहे. स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये कोणतीही जनजागृती किंवा पूर्वसूचना देण्यात आलेली नाही. सध्याच्या परिस्थितीत स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे आर्थिक शोषण होत आहे हे तात्काळ थांबवावे नसता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी कपिल आकात यांच्या सह माजी नगराध्यक्ष विनायक काळे, माजी नगरसेवक अंकुश तेलगड,माजी नगरसेवक विजय राखे, वैजनाथ बागल,सय्यद अरेफ अली,कदिर कुरेशी,रजाक कुरेशी,इफ्तेखार काजी,परवेझ देशमुख,सिद्धार्थ बंड,संजय राऊत,अरुणराव मगर,तुळशीराम निकाळजे,अन्वर पठाण,मसाज अन्सारी,साहेबराव राऊत,शेख सादेख, अखिल काजी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासींच्या बाधित घरांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करा- आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

करंजाडेजवळील वडघर ग्रामपंचायत हद्दीतील फणसवाडी येथील आदिवासींच्या घरांवर सिडकोने तोडक कारवाई केली होती. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी नुकताच राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांची भेट घेऊन आदिवासींची कैफियत मांडली. या वेळी मंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत सिडको हद्दीत आदिवासींची किती बाधित घरे आहेत याचा सर्वेक्षण करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. सिडकोच्या जागेवर असलेल्या फणसवाडीत आदिवासींची ३२ घरे होती. महात्मा फुले कॉलेजकडे किंवा विमानतळाच्या पुनर्वसनाच्या वसाहतीकडे जाणारा जो मार्ग आहे त्यावरचा क्रॉसिंग रोड बंद करून रेल्वेला बनवलेल्या डक्टमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्या रस्त्यातील १२ घरे पुनर्वसनाचे कुठलेही आश्वासन न देता सिडकोकडून एप्रिल महिन्यात निष्कासित करण्यात आली. या पार्श्वभूमीवर आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह भाजप उत्तर



रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, कर्णा शेलार, आदिवासी संघटनेचे श्री. लांडगे, गणेश कातकरी, गुरू पवार, संतोष पवार, सिडकोचे श्री. ढगे आदी उपस्थित होते. या वेळी मंत्री डॉ. उईके यांनी सिडकोचा एक अधिकारी नेमून आदिवासींच्या बाधित घरांची स्थळपाहणी करा आणि त्याचा अहवाल सादर करा, असे निर्देश दिले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी पनवेल-उरण विधानसभा क्षेत्रामधील सिडको हद्दीत जेवढ्या आदिवासीवाड्या आहेत त्यात सुमारे सातशे ते आठशे जास्तीत जास्त एक हजार कुटुंब असतील, त्यांना प्रत्येकी एक हजार स्केअर फूटचा एक गुंठा प्लॉट उपलब्ध करून दिल्यास त्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन होईल, अशी मागणी मंत्री डॉ. उईके यांच्याकडे केली. मंत्रीमहोदयांनी आदिवासींसाठी अशाच प्रकारे चांगली वसाहत निर्माण करू, असे आश्वासित केले.

# साखरा येथे नवनियुक्त कर्मचारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

आषाढी एकादशी तथा माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून साखरा येथील शासकीय- निमशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दि. ६ जुलै रोजी गावातील नवनियुक्त कर्मचारी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. तब्बल १३ वर्षांपासून येथील कर्मचारी सदर कार्यक्रमाचे आयोजन करीत आहे. यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनाला हातभार लागत आहे. या कार्यक्रमांतर्गत कु. अष्टमी श्रावण राठोड व विष्णू उदयसिंग चव्हाण या नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता बारावीमधून हिमांशू



रमेश जाधव, अंजली बळीराम जाधव, सलोनी शंकर चव्हाण यांचा तर इयत्ता दहावीमधून सुचिता राजेश राठोड, हर्ष संदीप राठोड, वैदही विवेक चव्हाण, माहेश्वरी दिलीप चव्हाण, शिवम प्रकाश जयस्वाल, ओजस दीपक राठोड, जान्हवी रवी आडे, सिद्धी कैलास माळवे, कबीर प्रेमदास जाधव, चांदणी राम आडे यांचे आणि शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र म्हणून निर्मित रोशन राठोड या सर्वांचे सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला उद्घाटक आणि प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक उत्तमराव मनवर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध वैद्य डॉ. विनोद आडे तर प्रमुख अतिथी म्हणून अशोक चव्हाण उपस्थित होते. सेवापूर्ती सोहळ्याचे सत्कारमूर्ती म्हणून कैलास राठोड यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन संदीप राठोड यांनी तर आभार शंकर चव्हाण यांनी मानले. उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तमराव मनवर, डॉ. विनोद आडे आणि दीपक राठोड यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सदगुण चव्हाण, राजेश राठोड, रमेश जाधव, शुभम चव्हाण, योगीराज राठोड, अजय राठोड, रवि चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.जीवन जैन "धन्वंतरी पुरस्कारा"ने सन्मानित!

दैनिक युवक आधार
मुंबई (किशोर गायकवाड
) आरोग्यसेवेमध्ये सलग ४० वर्षांची अतुनीय कामगिरी बजावणारे प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ.जीवन जैन यांना मुंबई समाचार तर्फे दिला जाणारा "धन्वंतरी पुरस्कार" नुकताच प्रदान करण्यात आला.
हा सन्मान गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. भूपेंद्रजी पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आपल्या भावनांचा उल्लेख करताना डॉ.जीवन जैन म्हणाले, "हा पुरस्कार माझ्या प्रत्येक रुग्णाला, मार्गदर्शकांना, आणि सहकाऱ्यांना समर्पित आहे, जे या प्रवासात माझ्यासोबत होते. हा सन्मान मला नम्र आणि कृतज्ञ बनवतो."



# खासदार निलेश लंके यांनी दिली उद्योजक व गारगुंडी गावचे सुपुत्र प्रकाश झावरे यांच्या घरी सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधि**
**किरण बांधणकर**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट खासदार निलेश लंके यांनी पेण तालुक्यातील उद्योजक व गारगुंडी गावचे सुपुत्र प्रकाश झावरे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली.या प्रसंगी रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे सर्वेसर्वा, उद्योजक व समाजसेवक राजूशेठ पिचिका यांनी खासदार निलेश लंके यांचा सत्कार व पाहुणचार केला.



यावेळी चर्चा करताना प्रकाश झावरे यांचे सुपुत्र पियूष हे सध्या अमेरिकेतील शिकागो येथे नोबेल विजेत्या अर्थतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी करीत आहेत. त्यांचाही उल्लेख याप्रसंगी करण्यात आला.

आपल्या मातीतील माणूस संघर्ष कष्ट जिद्दीच्या जीवावर पेण, रायगड येथे जाऊन उद्योग क्षेत्रात बांधकाम क्षेत्रात मोठे नाव कमावले अशा उद्योजक व गारगुंडी गावचे सुपुत्र प्रकाश झावरे यांच्या घरी सदिच्छा भेट देण्याचा आज योग आला असे उद्गार खासदार निलेश लंके यांनी यावेळी बोलताना काढले. या सदिच्छा भेटीप्रसंगी किहिम गावचे सरपंच पिंट्या शेठ गायकवाड,मनोज मोरे, संदेश शृंगारे, केतन भोईर, अंकित मोरे, दर्शन झेमसे, प्रथमेश ढेणे व इतर मित्रपरिवार उपस्थित होते.

## रिठद येथील कोल्हापुरी बंधाऱ्यातील काडीकचरा व लाकडे काढण्यास सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
रिसोड तालुक्यातील रिठद गावाजवळील कोल्हापुरी बंधाऱ्यामध्ये लाकडे व काडीकचरा अडकल्यामुळे पाण्याने आजूबाजूच्या जमिनीचे नुकसान होऊ शकत होते. जिल्हा परिषदेच्या लघू जलसंधारण उपविभागाने दखल घेऊन काडीकचरा व लाकडे काढण्यास प्राधान्य दिल्याने सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे बाजुलाच शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.त्यामुळे अतिपावासामुळे होणारे टळले आहे.आणी या बंधाऱ्यावरुन ये-जा करणाऱ्या शेतकऱ्याचेही समाधान झाले आहे.आणी वेळीच दखल घेतल्यामुळे जिल्हा परिषदेच्या लघू जलसंधारण उपविभागाचेही मनोमन आभार व्यक्त केले.



## प्रेरणा फाउंडेशन या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी बदलापूर येथील लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी.



**दैनिक युवक आधार**
**बदलापूर वार्ताहर**
**-गुरुनाथ तिरपणकर**
प्रेरणा फाउंडेशन रजि.546/AF38784/बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी येथे रविवार रोजी दि.6-07-2025 दु.4 वाजता लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी. या कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका/अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले.
एकादशी ला विठ्ठलाच्या दर्शनाला बरेच जण जातात पण यंदा ची आषाढी एकादशी हि या छोट्या बालगोपालांसोबत प्रेरणा फाउंडेशन ने साजरी केली कारण मुले हि देवघराची फुले म्हणतात. या मुलांच्या चेहऱ्यावरील समाधान व हास्य पाहून विठुरायाचे दर्शन घेतल्याचे समाधान झाले.
या बंजारा वाडीतील मुले शाळेत पिशवीमध्ये जसे जमेल तसे शाळेतील वही , पुस्तक, कंपास ई.सामान घेऊन जातात.पावसाळ्यात यांची पिशवी भिजल्यास पिशवीतील सामान खराब होते. यासाठी प्रेरणा फाउंडेशन तर्फे येथील बंजारा वाडीतील मुलांना शाळेचे दप्तर व खाऊ वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या वाडीला अन्नदान, धान्यदान, कपडे वाटप यासारखे कार्य प्रेरणा फाउंडेशन करत असते.या कार्यक्रमासाठी प्रेरणा फाउंडेशनचे खजिनदार रोहन गावकर, सचिव वैभव कुलकर्णी, उपखजिनदार सौ.दिव्या गांवकर , प्रार्थना फाउंडेशन चे संस्थापक प्रसाद मोहिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले व तसेच बंजारावाडीतील मावशीचे यांचे सहकार्य लाभले.प्रेरणा मॅडम ने बंजारावाडीतील लोकांच्या मुलाखती घेऊन तेथील समस्या जाऊन घेतल्या व त्यांना जमेल ते सहकार्य प्रेरणा फाउंडेशन अंतर्गत करण्याचे आस्वाशन दिले.

## ज्योतिर्लिंग विद्यालयात ३१ वर्षांनी सिंगल फेज(२४तास लाईट)



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
जिंती येथील विद्युतीकरण कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन उदयसिंह पाटील (उंडाळकर) यांच्या प्रयत्नातून निधी मंजूर झाला असून त्यातून ग्रामीण विकास संस्थेचे ज्योतिर्लिंग विद्यालयात सिंगल फेज(२४तास लाईट) चे काम पूर्ण करणेत आले.विद्यालयात सध्या त्रिफेज लाईट असल्याने शेती पंप च्या वेळेत ही लाईट उपलब्ध असायची शाळेची अनेक वर्षा पासून २४ तास लाईट ची मागणी होती ती या निमित्ताने पूर्ण झाली.याचा शाळेने उद्धाटन कार्यक्रम आयोजित केला होता.यावेळी मुख्याध्यापक अशोक कोठावळे यांनी या कामासाठी निधी उपलब्ध केल्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव पाटील यांचे हस्ते ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पाटील यांचा सत्कार केला,यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचाहीं गुणगौरव करण्यात आला.यावेळी विद्यार्थांना ज्ञान प्रबोधनी फोडेशन चे पदाधिकारी अमर पाटील यांनी विशेष असे मार्गदर्शन केले कार्यक्रमास शंकर पाटील गुरुजी,सोसायटीचे माजी चेअरमन वसंतराव पाटील,माजी सरपंच अशोक पाटील,निवृत्त पोलिस अधिकारी अशोक पाटील,सीताराम पाटील उर्फ बबन चेअरमन,शहाजी खोचरे,संभाजी पाटील,सुशांत पाटील,आण्णासो चव्हाण,शिवाजी पाटील, मेहुल आंबवडे,जयवंत पाटील,शाळेचे शिक्षक , पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वागत V व आभार संभाजी खोचरे यांनी मानले.

## संच मान्यता; इयत्ता ९ वी आणि १० वी च्या निकषांमध्ये

### शिथिलताबाबत कार्यवाही सुरू - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील**
संच मान्यता संदर्भात १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील इयत्ता ९ वी आणि १० वी च्या निकषांमध्ये शिथिलता देण्याच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले.
शालेय शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या संच मान्यतेसंदर्भात विधानसभा सदस्य विजय देशमुख यांनी विधानभेत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य नाना पटोले, जयंत पाटील यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला.शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सांगितले, राज्यात शैक्षणिक धोरण राबविताना शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून राबवले जात आहे. विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभागाच्यावतीने अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. राज्यातील कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, असेही मंत्री यांनी भुसे या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.
टप्पा अनुदान संदर्भात शिक्षकांच्या आंदोलनाबाबत मुख्यमंत्री आंदोलनकर्त्या शिक्षकांच्या प्रतिनिधींबरोबर संवाद साधणार असून यानंतर याविषयी निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

## गुरुपौर्णिमा विशेष प्रेरणादायी लेख – "गुरु : नवदिशेचा दीपस्तंभ"....

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
भंडारा -गुरुपौर्णिमा म्हणजे श्रद्धेचा, कृतज्ञतेचा आणि आत्मबोधाचा सोहळा. ही फक्त गुरूला नमस्कार करण्याची परंपरा नाही, तर ही त्या महान व्यक्तीच्या कार्याची आणि विचारधारेची पुनर्स्थापना आहे, जी व्यक्ती एका समाजाला नवी दिशा देऊ शकते.
आजच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीत गुरूंची भूमिका केवळ शैक्षणिक मर्यादांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती परिवर्तनाची मशाल घेऊन चालणाऱ्या विचारवंताची झाली आहे.

**पुरोगामी विचारांची गरज:-**
आज आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात आहोत. जुने चौकटीतले विचार, परंपरेत अडकलेली शिक्षणपद्धती, अंधश्रद्धा, जातपात आणि विषमता यांतून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी आजचा गुरू 'पुरोगामी विचारांचा वाहक' असणे गरजेचे आहे. तो प्रश्न विचारायला शिकवणारा, चाकोरीबाहेर विचार करायला उद्युक्त करणारा असावा. तो विद्यार्थ्यांना 'का?' आणि 'कसे?' या प्रश्नांची उत्तरे शोधायला शिकवतो, फक्त 'हेच खरं' सांगत नाही.

**आजच्या गुरूंचे कार्य – समाजाला दिशा देणारे:-**
गुरू हे केवळ पाठमोरी काळी फळ्यावर लिहिणारे शिक्षक नसून, ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, संवादक, मूल्यसंस्कार देणारे व्यक्तिमत्त्व आहेत. आज गुरूंनी डिजिटल शिक्षण, पर्यावरण संरक्षण, लैंगिक समानता, संविधानाचे मूल्य, मानवी हक्क, सामाजिक न्याय या विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये सजगता निर्माण करणे आवश्यक आहे. त्यांचा शालेय ज्ञानापुरता मर्यादित रोल नसून, ते सामाजिक परिवर्तनाचे बीज रोवणारे असले पाहिजेत.



**गुरूंचे आचरण – उदाहरणातून शिकवण:-**
शब्दांपेक्षा आचरण अधिक प्रभावी असते. गुरूंचे आचरण म्हणजे शुद्धता, शिस्त, सत्यनिष्ठा, करुणा आणि समतेचे मूर्तिमंत उदाहरण असावे. विद्यार्थ्यांनी फक्त त्यांच्याकडून अभ्यासच नाही, तर माणूस म्हणून कसे घडायचे हे शिकले पाहिजे. एका विद्यार्थ्याच्या आयुष्यात गुरूंचे स्थान आई-वडिलांएवढेच महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांचे वर्तन पारदर्शक, प्रेरणादायी आणि काळाच्या पुढे जाणारे असणे आवश्यक आहे.

आदर्श शिक्षक – एक प्रेरणादायक व्यक्तिमत्त्व
ज्ञानाचा साठा नसलेला गुरु केवळ प्रवचनकर्ता होतो; पण ज्ञानात गूढता आणि सर्जनशीलता निर्माण करणारा शिक्षक विद्यार्थ्यांना सृजनशील बनवतो.
तो स्वतःच्या चुका मान्य करतो, नव्या गोष्टी शिकायला तयार असतो, आणि विद्यार्थ्यांच्या मतांचा आदर करतो. तो केवळ गुणांवर नाही, तर क्षमतांवर लक्ष केंद्रित करतो.
विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करणारा गुरूच त्यांना आत्मभान देतो.
सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भात गुरूंची भूमिका:-
आज गुरूंनी विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवणारा नव्हे, तर समाजासाठी जबाबदार नागरिक बनवणे हे ध्येय ठेवायला हवे. भारतीय लोकशाही, संविधान, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, विविधतेतील एकता या मूल्यांची बीजे शिक्षकांच्या कृतीतून विद्यार्थ्यांच्या मनात रोवली गेली पाहिजेत.
सामाजिक दृष्टिकोनातून, शिक्षक हा सामाजिक समतेचा प्रचारक असावा. जाती, धर्म, वर्ग यामधील भेद मिटवणारा तो एक पथप्रदर्शक ठरतो.
सांस्कृतिक दृष्टिकोनातून, गुरूंनी भारताची विविध सांस्कृतिक परंपरा, लोककला, भाषिक विविधता याचे जतन व संवर्धन करायला हवे.
राजकीय दृष्टिकोनातून, शिक्षकाने विद्यार्थ्यांना विचारशक्ती देणारे, प्रश्न विचारणारे, संविधानाचे मर्म समजणारे आणि जबाबदारीने मतदान करणारे नागरिक घडवले पाहिजे.
अपेक्षा...
गुरुपौर्णिमा ही फक्त अभिवादनाचा दिवस नसून, ती आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. प्रत्येक गुरूने स्वतःला विचारावे – "मी केवळ शिक्षक आहे की परिवर्तनाचा एक दीपस्तंभ?"
समाजाला योग्य दिशा देणारे गुरू म्हणजेच खरी गुरुपौर्णिमेची पूजा.
– राहुल डोंगरे --
" पारस निवास " शिवाजी नगर तुमसर. जि. भंडारा. म. रा.
मो. न.9423413826

# संत रामपाल जी महाराज यांच्या सत्संगातून शास्त्रसिद्ध भक्ती आणि आध्यात्मिक प्रगतीची शिकवण

### "सत्संग मोक्ष की धारा कोई समझे। राम का प्यारा"

दैनिक युवक आधार
**नांदेड वार्ताहर**
०६ जुलै २०२५ - रोजी नांदेड जिल्ह्यात संत रामपाल - जी महाराज यांच्या अनुयायांकडून रूबी मंगल कार्यालयात MIDC सिडको नांदेड येथे संत रामपाल जी महाराज यांच्या सत्संगाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सत्संगामध्ये संत रामपाल जी महाराज यांचा प्रोजेक्टरच्या माध्यमातून सत्संग करण्यात आला होता. या सत्संग मध्ये सत् साधना व सतभक्ती बद्दल संदेश दिला गेला. या सत्संगाचा मुख्य उद्देश लोकांना जीवनातील सत्य आध्यात्मिक शांती आणि शास्त्र सिद्ध भक्तीचे महत्त्व समजावून



सांगणे हा होता. संत रामपाल जी महाराज यांच्या शिकवणीनुसार या सत्संगात सृष्टीच्या निर्मितीचे सत्य, जीवनाचा खरा उद्देश आणि मोक्षाचा मार्ग यावर प्रकाश टाकण्यात आला संत - रामपाल जी महाराज यांनी भगवद्गीता, - चार वेद पुराण, गुरुग्रंथ साहेब, बायबल आणि कुराण शरीफ यासारख्या पवित्र - धर्मग्रंथांचा आधार घेऊन आध्यात्मिक = प्रगतीचा सोपा आणि शास्त्रसिद्ध मार्ग - दाखवला आहे. कोणत्या देवाची सत साधना केल्याने आपल्याला मोक्ष मिळेल
आणि आपण मोक्ष प्राप्त करून व अमर लोकाला अर्थात त्या सतलोकात कसे जाऊ शकतो हे सत्संगामध्ये समजावून सांगितले. याशिवाय कबीर परमेश्वर हेच सृष्टीचे खरे निर्माता असल्याचे सविस्तरपणे पटवून देण्यात आले आणि त्याच्या भक्तीचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले गेले या सत्संगाने उपस्थित श्रद्धाकुंवर सकारात्मक प्रभाव पाडला आणि अनेकांना जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा मिळाली. उपस्थितांनी संत रामपाल जी महाराज यांच्या शिकवणीवर आधारित ज्ञान ऐकून आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळाल्याचे सांगितले. या सत्संगामुळे समाजात आध्यात्मिक जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली आहे. संत रामपाल जी महाराज यांचे अनुयायी भविष्यातही अशा सत्संगाचे आयोजन करत राहतील ज्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडतील, आणि लोकांचे जीवन अधिक अर्थपूर्ण बनेल. या उपक्रमामुळे लोक शास्त्रसिद्ध भक्ती्या मार्गावर चालण्यास प्रेरित होत आहेत असा संदेश श्रोत्यांनी दिला.

## शितल खिंडे यांची शिरूर अनंतपाळच्या गटविकास अधिकारीपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर**
**शिरूर अनंतपाळ :**
येथील पंचायत समीतीच्या रिक्त जाग्यावर गटविकास अधिकारीपदी शितल खिंडे यांची नियुक्ती करण्यात आली असून,त्यानी नुकताच आपल्या पदाचा पदभार घेतला आहे.त्या पंचायत समीतीच्या पहिल्या महिला गटविकास अधिकारी आहेत.त्यामुळे त्यांचा पंचायत समीती अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. शितल खिंडे या ता. लोहारा जिल्हा धाराशिव येथे गटविकास अधिकारी म्हणुन कार्यरत होत्या. त्यांची शिरूर अनंतपाळ पंचायत समीतीचे गटविकास अधिकारी म्हणुन बदली झाली आहे.त्यामुळे त्या शिरूर अनंतपाळ पंचायत समीतीत रूजू होऊन आपल्या पदाचा पदभार घेतला आहे.पंचायत समीतीच्या त्या पहिल्या महिला गटविकास अधिकारी ठरल्या आहेत.म्हणुन पंचायत समीतीच्या विविध विभागाचे



अधिकारी पदाधिकारी तालुक्यातील सरपंच यांच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. यावेळी सहायक गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड, गटशिक्षणाधिकारी अनिल पागे ,विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे,दिनकर व्होटे, मंडावले, मंजुर पटेल संग्राम भिंगोले, आतिक शेख,कक्षाधिकारी चंद्रकांत कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना त्यानी गतीमान प्रशासनास प्राधान्य देणार असल्याचे सांगुन कामचुकार कर्मचाऱ्यावर कारवाइ केली जाइल असे सांगितले.